म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८३९

# नव्या सरकारचे नऊ महिने

REFBK-0023081

विराट प्रकाशन

मूल्य २ रुपये

निबंध
२८३९
२३०८९
संदर्भशाळा
३०।२।८९

# नव्या सरकारचे नऊ महिने

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्रृ. मा. प. )
५०००-४-८०

निबंध
२८३१
२३०८९
संदर्भ शाखा
१०।२।८९

# नव्या सरकारचे नऊ महिने

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे.

रा. द. पणशीकर

REFBK-0023081

विराट प्रकाशन, मुंबई

# निवेदन

नव्या सरकारचे
नऊ महिने

विराट प्रकाशन
९

दीपावली
१९८०

प्रकाशक :
ब. ना. जोग
रा. द. पणशीकर
विराट प्रकाशन
३९६, स्वातंत्र्यवीर
सावरकर मार्ग,
प्रभादेवी,
मुंबई ४०० ०२५

मुखपृष्ठ :
बाळ ठाकूर

मुद्रक :
ज्ञानविलास मुद्रणालय,
२७ बुधवार पेठ,
पुणे २

**मूल्य दोन रुपये**

**विराट** प्रकाशनाच्या पहिल्या संचातील ही पुस्तिका वाचकांच्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. या प्रकारच्या पुस्तिकांची कल्पना गेली दोन वर्षे आमच्या मनात घोळत होती. अनेक मित्रांना, लेखकांना, विचारवंतांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना ही कल्पना सांगितली. अनेकांनी ती उचलून धरली. काहींनी मौलिक सूचना केल्या. लहान पुस्तिकांतून विविध विषयांवर माहिती देण्याचा उपक्रम नवीन नाही, मात्र या पुस्तिका मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध करून घरोघर पोचवण्याची कल्पना नवीन आहे.

समाजजीवन अधिकाधिक गुंतागुंतीचे होत आहे. अनेक घटनांचे परिणाम आपल्या नित्याच्या जीवनावर कळत न कळत होत आहेत. शिक्षित स्त्री-पुरुषांनी या घटना डोळसपणे समजावून घेऊन त्या घटनांना इष्ट ते वळण लावण्याचा प्रयत्न केला तर दिवसेंदिवस असह्य होणारे व्यक्तिगत व सामाजिक जीवन सुसह्य होईल.

या पुस्तिकेचे लेखक श्री. रा. द. पणशीकर गेली पंचवीस वर्षे पत्रकार असून ऐन आणीबाणीत त्यांनी विवेक साप्ताहिकाची धुरा कार्यकारी संपादक म्हणून वाहिली आहे. सडेतोड आणि साधार विवेचन, ओघवती भाषा आणि अचूक निष्कर्ष हे त्यांचे लेखनविशेष आहेत.

— **प्रकाशक**

# इंदिरा गांधींचे पुनरागमन

'**इंदिरा** लाओ, देश बचाओ !'

नऊ महिन्यांपूर्वी लोकसभेची मुदतपूर्व निवडणूक झाली तेव्हा इंदिरा काँग्रेसच्या प्रचारातील ही एक मुख्य घोषणा होती. अर्थ सरळ व स्पष्ट होता. देश रसातळाला चालला आहे. त्याला सावरायचे असेल, त्याला अव्यवस्था, गोंधळाच्या कर्दमातून वर काढायचा असेल तर सत्ता इंदिरा गांधींच्या हातात द्या.

काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यामधे तर निःसंदिग्ध शब्दात म्हटले होते -------

"इंदिरा काँग्रेस हाच एकमेव राष्ट्रीय पक्ष आहे आणि सध्याच्या संभ्रमावस्थेतून देशाला वाचवणाऱ्या इंदिरा गांधी याच एकमेव नेत्या आहेत.

"गेल्या अडीच वर्षांच्या अनुभवाने हेच शिकविले आहे की स्थिर आणि पुरोगामी सरकारच लोकांच्या अपेक्षा पुऱ्या करू शकेल. जनता व लोकदल यांच्या सरकारांनी निर्माण केलेल्या गोंधळातून असेच सरकार राष्ट्राला बाहेर काढू शकेल.

"या सरकारला अप्रतिहत राजकीय इच्छाशक्ती व सुस्पष्ट सामाजिक व आर्थिक उद्दिष्ट असेल; त्याच्यापाशी निश्चित कार्यक्रम असेल आणि तो अमलात आणण्यासाठी लागणारा दृढनिश्चयही असेल. आंतर्बाह्य दबाव आणि उद्रेक यातून तावून सुलाखून निघालेले नेतृत्व या सरकारपाशी असेल."

काँग्रेसचा हा निवडणूकनामा फार विचारपूर्वक तयार केला होता असे नव्हे. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की जनता अथवा लोकदल यांचे मर्मस्थान मात्र धूर्त काँग्रेसने नेमके जाणले होते. जनता पक्षाचे वर्णन अठरा धान्याचे कडबोळे किंवा खिचडी अशा शब्दांत होत असे. नायक असून निर्नायकी अवस्था जनता पक्षाची होती. जनता पक्षाचा अध्यक्ष जे बोलेल ते त्याचा सर-चिटणीस खोडून काढत असे आणि पंतप्रधानाच्या नेमके उलट वक्तव्य सरकारातील उच्चपदस्थ मंत्री करीत असे. या पक्षाला अथवा सरकारला एकमुखी नेतृत्व आहे असे कधी वाटलेच नाही. 'बारा भय्ये

तेरा चुली ' ही म्हण जनता पक्षाला बरोबर लागू पडत असे. व्यासपीठा-सारख्या क्षुल्लक प्रश्नावरून पंतप्रधानांची जाहीर सभा पक्षाने रद्द केली होती तर विमान तळावर आपल्या स्वागतासाठी कोणी वरिष्ठ पदाधिकारी आले नाहीत यामुळे रागावून मंत्रिमंडळातील क्रमांक दोनचे ज्येष्ठ मंत्री आपले सगळे कार्यक्रम रद्द करून घाईने राजधानीत परतले होते. आपापसा-तील भांडणांनी तर कळस गाठला होता. असा एकही दिवस उजाडला नसेल की जनता पक्षातील अंतर्गत कुरबुरी वर्तमानपत्रांच्या जाहीर चव्हाटयावर उघड झाल्या नसतील. सर्व लोक हे पहात होते, ऐकत होते, वाचत होते. आपला दारुण अपेक्षाभंग झाला आहे याची जाणीव जनतेच्या अंतर्मनाला होत होती. लोक जनता पक्षाच्या कारभाराला कंटाळले होते असे नव्हे, पण त्यांच्या स्वप्नाचा साफ चुराडा झाला होता. ' कधीही भंग न पावणारी, न गंजणारी पंचरसी धातूची लखलखीत तेजस्वी मूर्ती ' त्यांनी जी हृदयात जोपासली होती, त्याला तडा गेला होता. हिरकणी म्हणून हातात घेतली पण निघाली गारगोटी. लोकांनी दुःखाने, हळहळत वस्तुस्थिती मान्य केली आणि पर्यायासाठी आजूबाजूला पाहिले, तेथे उभा होता एक भूलभुलैय्या !

भूलभुलैय्या खराच ! १९७१ साली 'गरिबी हटाव'ची घोषणा देऊन इंदिरा गांधींनी लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुका घेतल्या व आपले आसन बळकट केले. गरिबी तर हटली नाहीच, उलट गरिबाला जीवनातून उठविण्याचे प्रयत्न झाले. असंतोष शिगेला पोचला तेव्हा आणीबाणी घोषित झाली आणि गरिबांवरून बुलडोझर फिरले. हा झाला इतिहास. पण इतिहास लक्षात कोण घेतो ? चरणसिंगांना पंतप्रधानपद हवे होते. मोरारजीभाई गेल्याशिवाय ही अंतरीची आस पूर्ण होणे शक्यच नव्हते. त्यासाठी इंदिरा गांधींना शासन करण्यास निघालेल्या चरणसिंगांनी इंदिरा गांधींचाच पाठिंबा मिळविला. पुन्हा एकदा भूलभुलैय्या ! २८ जुलैला पंतप्रधान म्हणून शपथ घेणाऱ्या चरणसिंगांवर अवघ्या २३ दिवसांनी म्हणजे २० ऑगस्ट १९८०ला राजीनामा देण्याची पाळी आली. त्या दिवशी स्वतःवर विश्वासदर्शक ठराव चरणसिंग लोकसभेत पास करून घेणार होते. लोकसभा खास एवढ्या कारणासाठीच बोलावली होती. पण सकाळीच इंदिरा गांधींनी चरण–अर्स संमिश्र सरकारला असलेला आपला पाठिंबा काढून घेतल्याचे जाहीर केले.

चरणसिंगांना आपले भवितव्य ध्यानात येण्यास वेळ लागला नाही. त्यांनी मंत्रिमंडळाची तातडीची बैठक बोलावली व राजीनामा देण्याचा निर्णय केला. लोकसभा बरखास्त करून जनतेचा ताजा कौल घेण्याची शिफारस राष्ट्रपतींना करण्याचा निर्णयही याच बैठकीत करण्यात आला. इकडे लोकसभा विश्वास-दर्शक ठरावावर चर्चा करण्यासाठी भरली असता पंतप्रधान चरणसिंगांची मोटर राष्ट्रपती भवनाकडे निघाली होती. राष्ट्रपतींनी राजीनामा स्वीकारला व पुढील व्यवस्था होईपर्यंत काम पहाण्यास चरणसिंगांना सांगितले. तशा अर्थाचे राष्ट्रपतींचे पत्र सभापतींनी लोकसभेत वाचून दाखविले व लोकसभा तहकूब झाली.

चरणसिंगांची पंतप्रधान होण्याची 'जिंदगीची तमन्ना' होती ती पुरी झाली तरी ते पायउतार होताच दोनशे वर्षांपूर्वीचे इतिहासाचे एक पान लोकांच्या डोळ्यासमोरून तरळून गेले असावे. १७६१ मध्ये सुरजमल जाटाने हिंदुस्थानची सर्वोच्च सत्ता आग्रा येथे मिळविली होती. पण चरणसिंगांच्या पूर्वजाला आपली सत्ता त्या वेळी केवळ २० दिवस टिकविता आली. चरणसिंग त्यामानाने नशीबवान. ते अधिक तीन दिवस दिल्लीच्या सिंहासनावर बसले आणि राष्ट्रपतींच्या कृपेने पुढे साडेचार महिने पंतप्रधान म्हणून कारभार पाहिला.

जनता पक्ष फोडण्यापासून चरणसिंगांना सत्तेवरून खाली खेचण्यापर्यंत इंदिरा गांधींचा निकटचा संबंध होता. चरणसिंगांनी इंदिरा काँग्रेसचा आपणाला बिनशर्त पाठिंबा आहे असे म्हटले होते. पण राष्ट्रपतींना त्यांनी जे पत्र लिहिले त्यात 'जातीय आणि एकाधिकारवादी शक्तींनी सरकारचा पराभव करण्यासाठी हातमिळवणी केली.' असा स्पष्ट उल्लेख आहे. २० ऑगस्ट-लाच चरणसिंगांनी एक जाहीर निवेदन प्रसिद्ध केले. त्यात आणीबाणीतील काही खटले काढून घ्यावयास हवेत असे सांगणाऱ्या इंदिरा गांधींचा पाठिंबा आपणास नको होता असे सांगताना ते म्हणतात, 'आणीबाणीच्या काळातील अत्याचारांना जे जबाबदार होते आणि ज्यांच्यामुळे हजारो निष्पाप नागरिक आणि त्यांचे कुटुंबीय यांना छळणूक आणि क्रूर यातना भोगाव्या लागल्या त्यांच्यावरील खटले केवळ सत्तेला चिकटून रहाण्यासाठी आम्ही काढून घेतले असते तर राष्ट्राने आम्हांला कधीच क्षमा केली नसती.

चरणसिंगांचा कारभार कितीही भोंगळ असला आणि त्यांचा सत्ता-स्वार्थ कितीही अमर्याद असला तरी स्वतःच्या हातांनी त्यांनी आणीबाणी-तील गुन्हेगारांना 'निर्दोष' ठरविले नाही हे कबूल केलेच पाहिजे. हरियाणात भजनलालांनी पुढे बन्सीलाल यांच्यावरील सर्व खटले काढून घेतले व स्वतःचे आसन राखले हे साऱ्यांना माहीत आहेच. चरणसिंग अशा राजकीय ब्लॅकमेलिंगला बळी पडले नाहीत.

दि. २२ ऑगस्टला राष्ट्रपतींनी लोकसभा बरखास्तीची व नव्या निवडणुकांची घोषणा केली. चरणसिंगांच्या राजीनाम्यापासून या घोषणे-पर्यंतच्या दोन-अडीच दिवसांत दिल्लीत राजकीय हालचाली व शहकाटशह यांना विलक्षण वेग आला होता. श्री. जगजीवनराम पंतप्रधान होण्याची संधी अनेकांच्या कारस्थानामुळे फसली. स्वतः राष्ट्रपतीही आपले वर्तन संशयातीत ठेवू शकले नाहीत. राजकीय धुळवडीत तेही सामील झाले असावेत असा संशय घेण्यास त्यांनी जागा ठेवली. श्री. नानी पालखीवाला यांच्यासारख्या नाणावलेल्या घटनातज्ज्ञाने राष्ट्रपतींच्या निर्णयावर आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले आहे, 'राष्ट्रपतींचे कृत्य घटनेतील तरतुदींनुसार मुळीच समर्थनीय होणार नाही. जगजीवनराम, विरोधी पक्षाचे नेते व सर्वांत मोठ्या पक्षाचे नेते म्हणून मंत्रिमंडळ बनविण्यास पात्र होते. अल्पमताचे सरकार चांगले व दीर्घकाळ चालल्याची जगात उदाहरणे आहेत.'

सरतेशेवटी निवडणुका घडवून आणण्यात व सत्ता काबीज करण्यात इंदिरा गांधी यशस्वी झाल्या, त्याची ही पार्श्वभूमी आहे. पण सत्ता आता त्यांना पेलेनाशी झालेली आहे. १९७१ मधे जेवढे यश त्यांना मिळाले होते तेवढेच यश १९८० मधे त्यांना मिळाले. दहा वर्षांपूर्वी लोकांचे भले त्या करू शकल्या नाहीत. चारच वर्षांत त्यांना आणीबाणी पुकारावी लागली. आताही अवघ्या नऊ महिन्यांत ७४–७५ ची परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ लागली आहे.

● ●

# प्रचंड बहुमताच्या वल्गना

"ऐंशी टक्के जनता इंदिरा गांधींच्या मागे असून वीस टक्के लोकच विरोधी पक्षांच्या पाठीशी आहेत. तेव्हा ऐंशी टक्केवाल्यांनी गप्प बसावे व ज्यांना जनतेत स्थान नाही त्यांनी सतत बोलत रहावे हे किती दिवस चालणार?" — **बॅ. अंतुले**

महाराष्ट्राचे मुख्य मंत्री आणि इंदिरा काँग्रेसचे माजी सर-चिटणीस बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले यांनी गेल्या महिन्यात सातारा येथे बोलताना वरील सवाल विचारला आहे. सातारकरांनी मुख्य मंत्र्यांच्या आगमनप्रसंगी बंद पाळला व टंचाई, वाढती महागाई, गरिबांवरचे अत्याचार आणि दंगली या प्रश्नांकडे त्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. बॅरिस्टर मजकुरांना जनतेचे हे औधत्य पसंत पडले नाही. 'लोकांनी आम्हांला बहुमताने निवडून दिले असता आपल्या मार्गात अडथळे आणण्याचा या वीस टक्केवाल्यांना काय अधिकार?' असे सर्वत्र विचारत ते फिरत आहेत. अंतुल्यांच्या मुखाने काँग्रेसचे मनोगत जाहीर झाले हे चांगलेच झाले. त्यांच्या ८० टक्क्यांची त्यामुळे चिकित्सा करता येईल.

आपल्या देशातील निवडणूक पद्धतीत एक चमत्कारिक दोष असा आहे की विजयी पक्षाला त्याला मिळालेल्या मतांच्या तुलनेत कितीतरी अधिक जागा मिळतात. स्वातंत्र्यापासून केंद्रस्थानी आलेल्या कोणत्याही सरकारला कधीही बहुमत मिळालेले नाही. १९५२ च्या पहिल्या निवडणुकीत काँग्रेसला ४५ टक्के मते मिळाली होती. ५७ साली ४७·८ टक्के मते, ६२ साली ४४·७ टक्के, ६७ साली ४०·७३ टक्के, आणि श्रीमती इंदिरा गांधींचा प्रचंड विजय—इंदिरा लाट म्हणून ओळखण्यात येते त्या १९७१ सालच्या निवडणुकीत ४३·०६ टक्के मते मिळाली होती. १९७७ साली काँग्रेस पराभूत झाली व जनता पक्ष विजयी झाला. पण जनता पक्षालाही ४५·०६ टक्के मते मिळाली. आता गेल्या जानेवारीत ज्या निवडणुका झाल्या त्यात इंदिरा काँग्रेसला ४२·५८ टक्केच मते मिळाली आहेत. मात्र या मतांच्या तुलनेत काँग्रेसने लोकसभेत मिळविलेल्या जागा फारच म्हणजे ६६ टक्के आहेत.

उत्तर प्रदेश हे मोठे राज्य असल्यामुळे व तेथून लोकसभेत होणारा खासदारांचा भरणा प्रचंड असल्याने तेथील आकडेवारीही नमुन्यादाखल पहाण्यासारखी आहे. १९७७ मध्ये जनता पक्षाचा विजय झाला तेव्हा काँग्रेसला (तेव्हा काँग्रेसची दुसरी फाळणी झालेली नव्हती) २५ टक्के मते मिळाली होती. पण संपूर्ण राज्यात एकही जागा काँग्रेसला मिळाली नाही. या वर्षी जानेवारीत झालेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या मतांत १० टक्क्यांची वाढ झाली–म्हणजे ३५ टक्के मते मिळाली आणि जागा मात्र ६० टक्के मिळाल्या. याचा अर्थ असा की मतांच्या टक्केवारीत थोडीशीही वाढ झाली की यशापयशाचे पारडे एकदम उलटे सुलटे होते. ४५ टक्क्यांच्यावर कधीही मते मिळवू न शकणाऱ्या काँग्रेसच्या मुख्य मंत्र्याने ८० टक्के मते आपल्या पाठीशी आहेत असे मिशीवर हात फिरवून कितीही आढ्यतेने सांगितले तरी सरकारनेच प्रसिद्ध केलेली ही आकडेवारी त्याचा दिमाख साफ उतरवण्यास पुरेशी आहे.

महाराष्ट्रात काँग्रेसला ४८ पैकी ३९ जागा लोकसभेत मिळाल्या. काँग्रेसच्या मतांची संख्या ५३ टक्क्यांच्या आसपास आहे. म्हणजे कामापुरते बहुमत आहे, पण ८० टक्के मात्र नव्हे. अर्थात १९७१ साली अविभक्त काँग्रेसला महाराष्ट्रात ६५ टक्के मते मिळाली होती त्या मानाने बराच पल्ला गाठावयाचा आहे. अशा स्थितीत अंतुले म्हणतात म्हणून विरोधकांनी गप्प बसावयाचे की काय? निवडणुकीनंतर लोकसभा व राज्यसभेचे अधिवेशन झाले होते. राज्यसभेत बोलताना काँग्रेसच्या खासदारांनी व खुद्द इंदिरा गांधींनीही आपणाला मिळालेल्या मतांचा विराट या शब्दात उल्लेख केला होता. त्या वेळी जनता पार्टीचे खासदार असलेल्या श्री. लालकृष्ण आडवाणींनी त्याला आक्षेप घेतला व बजावले की 'तुम्हांला बहुमत मिळालेले आहे व तुम्ही राज्य करता आहात हे तर खरेच आहे. पण विराट जनसमर्थन असे म्हणू नका. तुम्हाला ४२॥ टक्के मते मिळाली व निवडणूक पद्धतीतील दोषामुळे तुम्ही बहुसंख्येत येथे आलात. याचा अर्थ असा की निम्म्याहून अधिक मतदार तुमच्या बाजूचे नाहीत.' आधीच एकूण मतदान गेल्या निवडणुकीत कितीतरी कमी झाले होते. सुमारे ६० कोटी रुपये खर्च करून या निवडणुका घेण्यात आल्या. ३५,४०,२४,०८१ एवढे मतदार होते.

त्यांपैकी अवघ्या २०,१२,६९,१२९ एवढयांनी मतदानाचा हक्क बजावला. म्हणजे हे प्रमाण पडते ५६%. ह्या ५६ टक्क्यांपैकी ४२ टक्क्यांनी इंदिरा काँग्रेसला मते दिली. हेच वेगळया शब्दात मांडावयाचे तर असे म्हणता येईल की भारतातील एकूण ३५ कोटी ४० लक्ष २४ हजार मतदारांपैकी फक्त ८ कोटी ५० लक्ष ७६ हजार मतदार इंदिरा गांधी व त्यांची काँग्रेस यांच्या मागे आहेत. बाकीचे जवळ जवळ २७ कोटी मतदार काही विरोधी पक्षांच्या मागे आहेत व बाकीचे या निवडणूक गोंधळात आपणाला काहीही स्वारस्य नाही असे म्हणून राजकीय पक्षांच्या धुळवडीकडे पाठ फिरविणारे आहेत. जेव्हा जेव्हा काँग्रेसने असे 'प्रचंड' बहुमत मिळविले आहे तेव्हा तेव्हा अखिल भारतीय मतदानाचे प्रमाण असेच कमी होते. १९७७ साली जनता पक्षाला लोकांनी निवडून दिले त्या वेळी मतदारांतील जागृती स्पष्ट दिसून येत होती. ६०·५४ टक्के लोकांनी मतदान केले होते. १९७१ मधे जेव्हा 'इंदिरा लाट' होती असे म्हणतात तेव्हाही ५५ टक्क्यांच्या वर मतदान झाले नव्हते. भारतातील मतदारांची प्रचंड संख्या पाहता १ टक्का इकडे तिकडे होणे म्हणजे सुमारे ३०–३५ लक्ष मतांचा फरक पडणे होय. त्यामुळेच १० ते १२ टक्क्यांनी एखाद्या पक्षाच्या मतांच्या संख्येत फरक पडतो तेव्हा भुईवरचे अस्मानात जातात व अस्मानातील भुईवर कोसळतात.

विरोधी पक्षांची मते परस्परांत विभागली जातात याचाही फायदा काँग्रेसला मिळतो. जनता पक्ष फुटल्यामुळे काँग्रेसला हातोहात विजय मिळाला. देशभरची असंख्य उदाहरणे यासंबंधात देता येतील. तथापि सर्वांत मोठे राज्य म्हणून उत्तर प्रदेशचे उदाहरण घेऊ. तेथील सर्वच्या सर्व म्हणजे ८५ जागा काँग्रेसने लढविल्या व ५१ जागी विजय मिळविला. चरणसिंगांच्या लोकदलाने २५ जागी काँग्रेसबरोबर जवळजवळ सरळ लढत दिली व विजय मिळविला. ३० जागांवर लोकदलाचा दुसरा क्रमांक आला. लोकदलाने ७९ जागा लढविल्या आणि ३० जागा संपादन केल्या. आग्रा, मीरत, सलेमपूर, बिलहूर या मतदार संघांत जनता व लोकदल यांना एकूण १० लाखांवर मते मिळाली. परंतु प्रत्येक ठिकाणी जनता व लोकदलात मते विभागली गेल्याने काँग्रेसला विजय मिळाला. लोकदलाला उत्तर प्रदेशात काँग्रेस पेक्षा फक्त ७ टक्के मते कमी मिळाली व जागा एक तृतीयांशाहून अधिक म्हणजे

३० मिळाल्या. या निवडणुकीत आणखी एक गोष्ट विशेष आढळली आहे ती म्हणजे जनता व लोकदल यांना अनेक ठिकाणी १९७७ पेक्षा अधिक मते मिळाली. मात्र पक्षाचे दोन तुकडे झाले व त्याचा फायदा काँग्रेसला मिळाला. जनता पक्षाला ३ जागी विजय मिळाला, परंतु २५ मतदार संघांत पक्षाचा क्रमांक दुसरा आला. या २५ पैकी १७ जागा काँग्रेसला मिळाल्या तर ८ ठिकाणी लोकदलाचा विजय झाला. लोकदलाला ३० मतदार संघांत दुसरा क्रमांक मिळाला. या सर्व ठिकाणी काँग्रेस विजयी झाली. ४४ मतदार संघ असे होते की, काँग्रेसला लोकदल व जनता यांच्यापेक्षा कमी मते पडली आहेत तर ९ मतदार संघांत काँग्रेस विजयी उमेदवाराच्या आसपासही मते मिळवू शकली नाही. विरोधी मतांतील फाटाफुटीचा काँग्रेसला लाभ मिळाल्याचे उत्तर प्रदेशचे हे विदारक उदाहरण आहे.

इंदिरा गांधींच्या पुनरागमनाच्या या निवडणुकीत उमेदवारांची प्रचंड संख्या म्हणजे एक विक्रमच होता. लोकसभेच्या ५२५ जागांसाठी एकूण ४६०७ उमेदवार उभे होते. खाली लोकसभेत वेगवेगळ्या पक्षांच्या विजयी उमेदवारांची संख्या व त्यांना मिळालेल्या जागांची टक्केवारी दिली आहे.

(१९८० – जानेवारी)

| पक्ष | जागा लढविल्या | जिंकल्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| काँग्रेस (इं.) | ४८८ | ३५१ | ६६.८६ |
| जनता | ४३१ | ३१ | ५.९० |
| जनता (चरणसिंग) | २९१ | ४१ | ७.८१ |
| काँग्रेस (अर्स) | २१२ | १३ | २.४८ |
| मार्क्सिस्ट कम्यु. | ६२ | ३५ | ६.४७ |
| उजवे कम्यु. | ४८ | ११ | २.१० |
| द्रमुक | १६ | १६ | ३.०५ |
| अण्णा द्रमुक | २४ | २ | .३८ |
| अकाली | ७ | १ | .१९ |
| इतर | २०० | १६ | ३.०५ |
| अपक्ष | २,८२८ | ८ | १.५२ |
| | ४,६०७ | ५२५ | |

आपल्या निवडणूक पद्धतीतील दोषाचा आणखी एक विचित्र परिणाम पहाण्यासारखा आहे. २० कोटी १२ लक्ष मतदारांनी मतदान केले असे वर म्हटले आहे. या २० कोटींपैकी ९ कोटी ६० लक्ष मतदारांनी ज्यांना मते दिली ते उमेदवार निवडणूक हरले आहेत. म्हणजे एवढ्या प्रचंड संख्येचे प्रतिनिधित्व लोकसभेत नाही. ९ कोटी ९५ लक्ष मतदारांनी ज्यांना मते दिली ते विजयी झाले आहेत. टक्केवारीच्या भाषेत पराभूत उमेदवारांच्या मागे ४९.३० टक्के मतदार आहेत आणि विजयी उमेदवारांच्या मागे ५०.७० टक्के मतदार आहेत. १९७७ च्या निवडणुकीत विजयी उमेदवारांच्या मागे ६०.६६ टक्के लोक होते तेव्हा त्या विजयाला जनसमर्थन म्हणता येत होते. परंतु १.४० टक्केच अधिक लोक जेव्हा पाठीशी आहेत (आणि यांपैकी १७४ खासदार दुसऱ्या पक्षांचे असल्यामुळे त्यांना मतदान करणारे हे विरोधी मतदारच आहेत) तेव्हा प्रचंड विजय, विराट जनसमर्थन अशा शब्दांना काही अर्थ उरत नाही. हां, खासदारांची संख्या प्रचंड—अगदी दोनतृतीयांश—असल्याने राजसूत्रे हाती घेता येतात, हे खरे, पण राज्य करता येते, ते राज्य लोकप्रिय होते असे नव्हे. विजयाने नम्र व्हावे, उन्माद चढू देऊ नये. इथे विजय तर खऱ्या अर्थाने फसवाच आहे. या विजयातील पराभवाच्या खुणा ओळखून राज्यकर्त्यांनी सर्वसमावेशक व राष्ट्रहिताची धोरणे आखून लोकमानस सांभाळले पाहिजे. पण काँग्रेसची वृत्ती नेमकी याच्या उलट आहे. आणीबाणीत लोकांना भरडून काढले तरीही लोक आपणालाच निवडून देतात असा भ्रम इंदिरा काँग्रेसला झाला आहे. रेल्वेमंत्री कमलापती त्रिपाठी यांनी रेल्वेचे गुणगान करताना आणीबाणीची स्तुती केली होती. 'गाड्या एवढ्या वक्तशीर येत-जात की लोक गाड्यांवरून आपली घड्याळे लावीत' अशी उद्दाम भाषा त्रिपाठींनी वापरून ही शिस्त जनता राजवटीत कमी झाली म्हणून आपल्या भाषणात जुन्या सरकारला दोष दिला होता. हाच विजयाचा उन्माद विधानसभांच्याही मुदतपूर्व निवडणुका घेण्यास कारणीभूत झाला. राज्यसभेत बहुमत मिळाले पाहिजे हे जसे एक कारण या निवडणुकांमागे होते तसेच ९ राज्ये काँग्रेस विरोधात चालतात म्हणजे काय असा अहंकारही त्यामागे होता. जनता पक्षानेही सत्तेवर आल्यावर निवडणुका घेतल्या होत्या. पण ज्या राज्यांच्या निवडणुका घेतल्या तेथून काँग्रेसचा पूर्ण

पराभव झाला होता, या राज्यांनी आणीबाणीत केंद्रातर्फे काम केले होते व त्यांची मुदत संपली होती ही त्यामागे कारणे होती. आपल्या विजयाचा वारू सर्व ठिकाणी अप्रतिहत उधळावा हे एकमेव कारण इंदिरा गांधींनी विधानसभांच्या निवडणुका घेण्यामागे होते. २८ ते ३१ मे या काळात बिहार, गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, पंजाब, राजस्थान व तमिळनाडू या नऊ राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका झाल्या. तमीळनाडू सोडल्यास सर्व ठिकाणी मतदान अतिशय कमी — हाही एक विक्रमच झाला. कमी मतदानाचा काँग्रेसला फायदा होतो तसा तो झाला. मुंबईसारख्या शहरात तर जेमतेम ३५ टक्के मतदान झाले. लोकसभा निवडणुकीच्या वेळी जनता पक्षात फाटाफूट होऊनही मुंबईत ७ पैकी ६ जागांवर जनता पक्षाला विजय मिळाला होता. विधानसभा निवडणुकीत कमी मतदानामुळे हे चित्र नेमके उलटे झाले. सुशिक्षित मतदार घराबाहेर पडला नाही, खेडोपाडी शेतीची कामे व सार्वत्रिक उदासीनता यामुळे मतदान भरघोस होऊ शकले नाही. ९ पैकी ५ राज्यांत इंदिरा काँग्रेसला २/३ बहुमत मिळाले, ३ राज्यांत साधे बहुमत मिळाले व १ राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. तमीळनाडूत इंदिरा काँग्रेस हारली तेथे ६५ ते ७० टक्के मतदान झाले होते. काँग्रेस व द्रमुक यांच्या युतीला २३४ पैकी केवळ ६८ जागा मिळाल्या तर अण्णा द्रमुक आघाडीला १६२ जागी विजय मिळून दोन तृतीयांशाहून अधिक आमदार निवडून आले.

विधानसभांच्या निवडणुकांच्या वेळी जनता पक्षात पुन्हा फूट पडून भारतीय जनता पक्ष वेगळा झाला. म्हणजे पूर्वीच्या जनता पक्षाचे आता तीन पक्ष झाले. याचा परिणाम निवडणुकीवर होणे अपरिहार्य होते. १९६७ च्या वेळी झाली तशी एक आघाडी करणेही जमले नाही एवढी कटुता वातावरणात होती. परिणामी काँग्रेसला मोठा विजय मिळाला. काही तुलनात्मक आकडेवारी दिली तर विरोधी पक्षांना मिळालेला तडाखा ध्यानात येईल.

विधानसभा विसर्जनाच्या वेळी बिहारमधे जनता व जनता (एस) यांचे १८३ आमदार होते तर काँग्रेसचे ३९ आमदार होते. दोन्ही कम्युनिस्ट २४ व अर्स काँग्रेस १५. मे अखेरीच्या निवडणुकीनंतर भाजप, लोकदल व जनता यांचे एकूण ७५ आमदार, दोन्ही कम्युनिस्ट २९, अर्स काँग्रेस १४ व इंदिरा

काँग्रेस १६६ असे चित्र झाले. उत्तर प्रदेशात जनताचे १५९ आमदार होते व इंदिरा काँग्रेसचे ४३. निवडणुकीनंतर भाजप, जनता व लोकदल यांचे मिळून ७४ व इं. काँग्रेसचे ३०६ झाले, मध्य प्रदेशमध्ये जनता व लोकदल यांचे २३६ आमदार व इं. काँग्रेसचे ६५ होते, निवडणुकीनंतर इंदिरा काँग्रेसचे २४५ व भाजप, जनता आणि लोकदल मिळून ६२ निवडून आले. राजस्थानमध्ये जनता व लोकदल यांचे १४५ व इंदिरा, काँग्रसचे ३०. निवडणुकीनंतर इंदिरा काँग्रेसचे १३३ व भाजप, जनता आणि लोकदल यांचे मिळून ४७. महाराष्ट्रात जनता व लोकदल ९६ व इंदिरा काँग्रेस ८९ आणि निवडणुकीनंतर इंदिरा काँग्रेस १८६, भाजप-जनता ३१ व अर्स काँग्रेस ४७ असे चित्र झाले. सर्वसाधारणपणे इंदिरा काँग्रेस व विरोधक यांनी सत्तेप्रमाणेच आपली संख्यात्मक ताकदही या निवडणुकीनंतर बदलली असे म्हणता येईल. पण कमी मतदान आणि फाटाफुटीचा फायदा इंदिरा काँग्रेसला मिळाला व बंगाल, तमीळनाडू आणि केरळ ही राज्ये वगळता केंद्र व इतर सर्व राज्यांत इंदिरा काँग्रेसच्या हातात एकमुखी सत्ता आली. तथापि आमदार, खासदारांचे बहुमत म्हणजे लोकमताचा खराखुरा पाठिंबा नव्हे हे आपण वर पाहिले आहेच. आपल्या देशाच्या समस्या प्रचंड व गुंतागुंतीच्या आहेत. अत्यंत प्रतिभाशाली व लोकांच्या हृदयांची स्पंदने छेडणारा पक्षच राष्ट्राला उज्ज्वल भविष्याच्या वाटेवर नेऊ शकेल. स्वार्थी, पोटभरू व सत्तालुटारूंचे हे काम नव्हेच. राष्ट्राध्यक्ष श्री. संजीव रेड्डी यांनी गेल्या स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्राला उद्देशून बोलताना जे विचार प्रकट केले ते या संदर्भात महत्त्वाचे आहेत. श्री. रेड्डी म्हणाले,

" गेल्या वर्षीच्या अस्थिरतेनंतर केंद्रस्थानी एकाच पक्षाचे स्थिर सरकार आहे. संसदेत सत्ताधारी पक्षाकडे पुरेसे बहुमत आहे. तरीसुद्धा केवळ संख्याशक्तीवर स्थिरता अवलंबून नसते हे लक्षात घेतले पाहिजे. सत्ताधारी पक्षाने केवळ पक्षीय दृष्टिकोनातून न पहाता राष्ट्रीय दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. "

• •

# बाजारबुणग्यांची संघटना

" गांधी-नेहरूंच्या काळात ज्या संकेतांवर काँग्रेसची उभारणी झाली त्यांना हळूहळू नष्ट केले जात आहे. सहकारित्व, विश्वास व समान ध्येयासाठी काम करीत असल्याची भावना संघटणेत कार्यकर्त्यांना एकत्र ठेवते. पण इथे व्यक्तिगत दृष्टिकोन व व्यक्तिगत निष्ठा यांचेच प्राबल्य आहे. त्यामुळे शांतपणे चर्चा, विचारविनिमय, सहकारित्व व सहभागित्व या भावनांना जागा नाही.

" राष्ट्रीय स्तरावरही चर्चेचा संपूर्ण अभाव आहे. राष्ट्रासमोर गंभीर समस्या आहेत. त्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय सहमती शोधली पाहिजे. पण जेथे सत्ताधारी पक्षातच सहिष्णुतेऐवजी व्यक्तिगत दबाव व निष्ठेची एकेरी कल्पना आहे तेथे काय होणार ? ... " — **हेमवतीनंदन बहुगुणा**

श्री. बहुगुणा यांनी गेल्या मे महिन्यात काँग्रेसच्या सेक्रेटरी जनरल पदाचा राजीनामा दिला व खासदारकीही सोडली त्या वेळी प्रसिद्ध केलेल्या निवेदनातील वरील परिच्छेद आहेत. श्री. संजय गांधी व बहुगुणा यांचे पटत नव्हते. लोकसभेसाठी उत्तर प्रदेशच्या उमेदवारांची निवड, आगामी विधानसभा निवडणुकीतील उमेदवार इत्यादी मतभेदाचे मुद्दे होते. पद सेक्रेटरी जनरलचे मुद्दाम निर्माण केलेले, परंतु कारभार पहायचा बुटासिंग, यशपाल, संजय गांधी यांनी. हे बहुगुणांना पटेना. केंद्रीय मंत्रिमंडळांत त्यांना स्थान मिळाले नव्हते, उत्तर प्रदेशच्या राजकारणात आवश्यक त्या खेळी खेळता येत नव्हत्या. या सेक्रेटरी जनरलला कोणी विचारीतच नव्हते. अशा स्थितीत कुरकुर करून पाहूनही काही जमेना तेव्हा त्यांनी राजीनामा दिला. बहुगुणा स्वतः निष्ठेसाठी प्रसिद्ध नाहीत. 'नटवरलाल' म्हणून त्यांची कीर्ती पसरलेली. परंतु काँग्रेसच्या कारभाराचे वर्णन मात्र त्यांनी अचूक केले आहे. ते श्रीमती इंदिरा गांधींना लिहिलेल्या पत्रात तक्रार करतात, इंदिरा काँग्रेसमध्ये सर्व काही कंट्रोल करणारा मनुष्य संजय आहे. But power without responsibility is a dangerous thing.'

उमेदवारांची एकतर्फी यादी प्रसिद्ध करणे, प्रदेश समित्यांच्या नेमणुका व बरखास्ती कोणताही विचारविनिमय न करता करणे, प्रशासनात ढवळा-ढवळ करणे, अधिकाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात बदल्या करणे इत्यादी असंख्य तक्रारी बहुगुणांनी केलेल्या आहेत.

बहुगुणांनी वर्णन केले तशीच काँग्रेस संघटणेची स्थिती आहे. अगदी अलीकडे सरचिटणीस झालेले श्री. वसंतदादा पाटील यांनीही सरचिटणीस होण्यापूर्वी संघटणा म्हणून इंदिरा काँग्रेस अस्तित्वातच नाही असे उद्गार काढले होते. पाच राज्ये सोडून सर्व ठिकाणी इंदिरा काँग्रेसची सत्ता आहे, पण एकाही मुख्य मंत्र्याचे आसन स्थिर नाही. परवा मुंबईत श्रीमती इंदिरा गांधींनी काँग्रेस आमदारांना आपल्याच सरकारविरुद्ध तक्रार करता तर पाच वर्षांनी निवडणुका कशा जिंकणार असा सवाल विचारला. इंदिरा काँग्रेस सरकारे जूनमध्ये राज्यांवर आली. त्यांच्या पहिल्याच दिवसापासून त्यांच्या विरुद्ध तक्रारी सुरू आहेत असे स्वतः पक्षाच्या अध्यक्ष व पंतप्रधानच म्हणतात. तेव्हा काँग्रेस संघटणा ही काय चीज आहे हे जरा खोलात जाऊन पहाणे भाग आहे.

इंदिरा गांधींनी स्वतःच्या हातांनी काँग्रेसचे दोन वेळा विभाजन केले. जुन्या स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यागी व निष्ठावान माणसांना बाजूला सारले. प्रशासनाचा अनुभव असलेल्यांना तोडून टाकले. ७७ च्या पराभवानंतर जी काही थोडी बहुत कर्तृत्ववान व विचारी मंडळी काँग्रेसमध्ये होती त्यांनाही दूर केले व स्वतःच्या नावावर संघटणा चालू ठेवली. या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीतील विजयाने पुन्हा एकदा इंदिरा काँग्रेसमधे बाजारबुणग्यांचा प्रचंड लोंढा आला. यात हौशे, गवशे, नवशे सर्व होते तसेच जुने सत्तालुटारूही होते. पण कोणाची पारख करताना तो संजय व इंदिरा गांधी यांचे किती ऐकेल व त्यांच्यापुढे किती वाकेल एवढा एकच निकष पाहिला गेला. बहुगुणांना इंदिराबाईंनी जे उत्तर लिहिले त्यात "सरकार कोणाचेही असले तरी महत्त्वाचे अधिकारपद मिळावे हा आपला हक्कच आहे असे तुम्हांस वाटत नाही काय?" असा प्रश्न विचारला होता. पण श्रीमती इंदिरा गांधींना हे जर माहीत होते तर बहुगुणांना काँग्रेसमध्ये घेऊन त्यांना सेक्रेटरी जनरल केलेच कशासाठी हा प्रश्न शिल्लक उरतोच. मला काँग्रेसला 'मास बेस' मिळवून

द्यायचा होता असे बाईंचे त्यावर म्हणणे आहे. असा 'मास बेस' पक्षाला मिळवून देण्याचा प्रयत्न जनता पक्षानेही केला होता व म्हणूनच इंदिरा-संजयची चरणधुळी कपाळाला लावणाऱ्या लोकांचीही जनता पक्षात भरताड झाली. एस. एम. जोशींसारख्या वृद्ध नेत्यानेही गंगेला गटार येऊन मिळाले तरी पवित्रच होते असा युक्तिवाद तेव्हा केला होता. पण प्रत्यक्षात गंगा-जलापेक्षा गटाराचेच पाणी अधिक झाले व गंगेचे प्रदूषण झाले.

जानेवारी ८० च्या निवडणुकीनंतर या देशाचे राजकीय वातावरण किती गढूळ झाले हे पहाण्यासारखे आहे. भजनलाल हे हरियाणाचे जनताचे मुख्य मंत्री. इंदिरा गांधींचा विजय झालेला पहाताच पाऊण महिनाही उलटू न देता त्यांनी ३७ आमदार व स्वतःचे मंत्रिमंडळ यांसह इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. विधानसभेत काँग्रेसचे ८ आमदार होते ते एका रात्रीत ४७ झाले. डॉ. मंगलसेन व श्रीमती कमला वर्मा यांचा या अद्वितीय पक्षांतराला विरोध होता त्यांना राजीनामा देण्यास भाग पाडण्यात आले. या हरियाणा प्रकरणाचा विशेष असा की केवळ एक आठवड्यापूर्वी भजनलाल यांनी जनता पक्षाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली होती. इंदिरा गांधींनी हरियाणा विधानसभेचे विसर्जन केले नाही वा तेथे निवडणुका घेतल्या नाहीत. राजकीय चारित्र्यहीनतेचे याहून किळसवाणे उदाहरण जगभरही शोधून सापडणार नाही.

हरियाणाच्या पाठोपाठ हिमाचलमधे पक्षांतराने सरकार कोसळले. जनता पक्षाचे ५४ आमदार होते. त्यातील २४ जणांनी इंदिरा काँग्रेसचा आश्रय घेतला. मुख्य मंत्री श्री. शांताकुमार राजीनामा देताना उद्वेगाने म्हणाले, 'जनता सरकारने पक्षबदलविरोधी कायदा न केल्याची ही किंमत आहे.'

कर्नाटकात देवराज अर्स मुख्य मंत्री होते. देवराज एकेकाळी इंदिरा गांधींचे भक्त असलेले. परंतु आता विरोधात गेले म्हणून तेथेही ही पक्षांतराची मात्रा देण्यात आली. अर्स पायउतार झाले व गुंडुराव इंदिरा काँग्रेसचे मुख्य मंत्री बनले. जेथे वरीलप्रमाणे प्रयोग यशस्वी होण्यासारखे नव्हते तेथे विधानसभा विसर्जन करून निवडणुका घेण्यात आल्या.

इंदिरा काँग्रेस ही किती कमकुवत संघटणा आहे याचे प्रत्यंतर

विधानसभा निवडणुकीनंतर लगेचच येऊ लागले. नऊपैकी ८ राज्यांत इंदिरा पक्षाला सत्ता मिळाली. पण या राज्यांचे मुख्य मंत्री आठवडा उलटला तरी ठरेनात. कारण इच्छुक अनेक, परंतु प्रश्न बाईंच्या पसंतीचा. शिवाय अंतर्गत ओढाताण जोरात चालू होतीच. दि. ७ जूनला उत्तर प्रदेश, महाराष्ट्र व मध्यप्रदेशचे नेते ठरले. श्री. विश्वनाथ प्रतापसिंग, बॅ. अबदुल रहेमान अंतुले आणि अर्जुनसिंग इंदिरा गांधींच्या पसंतीस उतरले. उत्तर प्रदेशच्या आमदारांनी संजय गांधींच्या नावाचा घोळ घातला होता. अखेर श्रीमतीजींनीच संजयचा प्रश्न Out of question आहे असे सांगून वाद मिटविला. वरील तिघांचा शपथविधी ९ जूनला झाला तर इतर पाचाचा त्याहीनंतर. महाराष्ट्राचे, मध्यप्रदेशचे मंत्रिमंडळच बनेना. काही मंत्र्यांचा १४ जूनला शपथविधी झाला. बॅरिस्टरमजकूर सर्व जिल्ह्यांत फिरून आमदारांची कामगिरी पाहून मंत्री ठरवणार होते. अखेर दोन वेळा मंत्रिमंडळात वाढ केली तरी अजूनही–म्हणजे ऑक्टोबर मध्यापर्यंत–मंत्रिमंडळ पूर्ण झालेले नाही. हरिजन, आदिवासी, अल्पसंख्य या गटांच्या तक्रारी आहेत व मुख्य मंत्र्यांवर राग आहे. पंजाबच्या दरबारासिंगांनी कमालच केली. तब्बल १५ खाती स्वतःच्या मांडीखाली ठेवून मंत्रिमंडळाच्या विस्ताराचा प्रश्न त्यांनी अगदीच सोपा केला. मध्यप्रदेशात उपमुख्यमंत्री म्हणून श्री. सोळंकी यांची नेमणूक करावी लागली तर महाराष्ट्रात त्या स्थानासाठी सौ. शालिनीबाई पाटील यांनी घोळ घातला. त्यांना क्रमांक दोनचे स्थान व महसूल खाते देऊन समजूत घातली गेली. आता शालिनीबाई 'महसूल म्हणजेच सरकार' असे सांगत गावगन्ना फिरतात व लोकांची करमणूक करतात. तथापि त्यांच्या सासर घरीच काँग्रेस कार्यकर्ते या महसूलाला म्हणजेच सरकारला सांगतात की तुमच्या कर्तबगारीचा पाढा समजला. पण टंचाई, महागाईचे काय करता बोला. महसुलापेक्षा आम्हाला हेच प्रश्न महत्त्वाचे वाटतात. बाई झाल्या तरी काय बोलणार? त्या मुख्यमंत्र्यांवरच डाफरतात आणि मंत्रिमंडळात "अनुभवी लोकांचा भरणा केला असता तर विधानसभेत मान खाली घालण्याचा प्रसंग आला नसता" असा सल्ला देतात.

श्री. अंतुले यांनी ५५ दिवस कारभार पाहिला नाही तोच त्यांच्या कामाचा आढावा असंतुष्ट आमदार घेऊ लागले आणि दिल्लीपर्यंत गाऱ्हाणी

नेऊ लागले. महाराष्ट्राचे हे मंत्रिमंडळ अगदी '८० टक्के लोकांचा पाठिंबा लाभलेले' व 'अॅब्सोल्यूट मेजॉरिटी' असलेले; परंतु स्वतः मुख्य मंत्र्यासकट तीन मंत्री निवडणूक न लढवलेले. आमदार आपापसात खल करतात, कुचेष्टा करतात व जाहीरपणे पत्रके काढतात—असा कारभार चालला आहे. मुख्य मंत्र्यांवरील हे आमदारी संकट पाहून एक राज्यमंत्री चंद्रकांत त्रिपाठी यांनी तर अंतुल्यांच्या रक्षणार्थ 'संजय फ्रंट' काढली. अंतुल्यांविरुद्ध कारवाया करणाऱ्यांना समज देण्याचे काम ही फ्रंट करणार आहे म्हणे! आणि स्वतः मुख्यमंत्र्यांनी तीन महिने होताच 'कारभाराचे शंभर दिवस' प्रसिद्ध केले. खासदारांना डझनभर मोटरी देण्याचे दिल्लीत आश्वासन दिले. पण कायदे मंत्री श्री. रामराव आदिक यांनी—खासदारांच्या कामाचा अहवाल विधान भवनात ठेवला जाईल' असे सांगून आग्या माश्यांचे मोहोळ उठविले.

आंध्रचे चेन्ना रेड्डी! हा मुख्य मंत्री बाईंना डोईजड वाटू लागला. इंदिरा गांधींजवळ सत्ता नव्हती तेव्हा आंध्र व कर्नाटकाने त्यांची लाज राखली होती. पण चेन्ना संजय यास पसंत नव्हते व बाईंच्या होस हो म्हणारेही नव्हते. मग त्यांना हुसकण्याची कारस्थाने सुरू झाली. ऑगस्ट महिन्यात खासदार व मंत्री यांनी ४८ तास चेन्नांना कसे हुसकावयाचे याची चर्चा केली. मुख्य मंत्र्यांची वागण्याची पद्धत पक्षप्रतिमा डागळणारी आहे इत्यादी नेहमीच्या तक्रारी सुरू झाल्या. दिल्लीवाऱ्या तर होतच होत्या. मंत्रिमंडळात गट पडले. आमदारांत तट पडले. १९७१ पासून ब्रह्मानंद रेड्डीनंतरचे सर्व मुख्यमंत्री तेलंगणाचेच आहेत हा प्रचार सुरू झाला. चेन्ना रेड्डीनींही दर्गे, मशिदी, तिरूपती आदी सर्व धर्मीय उपासना चालू ठेवली. मंत्राभिषेक, ब्राह्मणभोजने उभय गटांकडून होऊ लागली. अखेर चेन्नांनी राजीनामा देण्याचा फतवा निघाला. परंतु त्यांच्याबरोबर १२६ आमदार आहेत, त्यांचा मुस्लिम मतदारांवर प्रभाव आहे याचाही विचार करावा लागला आणि श्री. चेन्ना रेड्डी हैद्राबादला विमानातून परतत असतानाच 'राजीनाम देऊ नये' असा संदेश त्यांना देण्यात आला. अखेर आता गेल्या ११ ऑक्टोबरला केंद्रीय मजूर खात्याचे राज्यमंत्री अंजय्या यांनी आंध्रचे मुख्य मंत्री व्हावे असे ठरविण्यात आले व त्यांचा शपथविधी झाला. आंध्रचे हे उदाहरण इंदिरा काँग्रेस पक्षाच्या संघटनेवर भरपूर प्रकाश टाकणारे आहे.

मंत्री गेले आता इतरांचाही नंबर लागेल यात शंका नाही. कर्नाटकचे गुंडूराव यांच्याविरुद्ध खुद्द केंद्रीय मंत्री जाफर शरीफ हे आहेत. गुंडुरावां-विरुद्ध राज्यात असंतोष आहे. आंदोलने, लाठीमार, गोळीबार नेहमीचे झाले आहे. हा असंतोष काँग्रेसवालेच संघटित करीत आहेत. सत्तेत वाटा मिळाला नाही ते असंतुष्ट काँग्रेसजन कारणे शोधतच असतात. श्री. शरीफ यांनी जानेवारी ८० नंतर पक्षात आलेल्या पक्षपालटूंना मंत्रिमंडळात घेऊ नये असे गुंडुरावांना सुनावले आहे. पण इंदिरा काँग्रेस पक्ष हा अशा पक्षपालटूंचाच आहे त्याला गुंडुराव काय करणार ? लोकसभा निवडणुकीआधी केवळ ४५ आमदार इं. काँ. त होते. त्यांची संख्या इंदिरा गांधींचा विजय होताच १२० झाली. आता यापैकी जर मंत्रिमंडळात काहीजण घेतले नाहीत तर सत्ते-साठीच आलेले हे पक्षपालटू गुंडुरावच नव्हे तर इंदिरा काँग्रेस तरी कर्ना-टकात शिल्लक ठेवतील काय ? आणि जिथे खुद्द श्री. वीरेंद्र पाटील यांना, त्यांनी इंदिरा गांधींविरुद्ध निवडणूक लढवूनही, केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळते तेथे साध्या आमदारांना राज्यात अधिकारपदे दिली तर काय बिघडले ? पण गुंडुरावांना आता आंध्रनंतर स्वस्थता लाभू दिली जाणार नाही हे खरे. हरियाणात भजनलाल–बन्सीलाल, मध्यप्रदेशात अर्जुनसिंग यांच्याविरुद्ध सेठी व शुक्ल, केंद्रीय गृहमंत्र्यांविरुद्ध पंजाबचे दरबारसिंग, राजस्थानात कुचकामी ठरलेले पहाडिया इत्यादी सर्वत्र बेबनाव आहे. वसंत-दादा पाटील म्हणतात ते खरेच आहे, इंदिरा काँग्रेसचे पक्ष म्हणून अस्तित्वच जाणवत नाही. याचे कारण संघटनेसाठी म्हणून पक्षात कोणीही नाही. जो तो सत्तेसाठी आहे. अशा स्थितीत पक्षीय स्तरावरही इंदिरा गांधी काही करू शकतील ही अशक्य गोष्ट आहे. मंत्र्यांच्या भाषणात कार्यकर्त्यांच्या मारामाऱ्या होतात. मंत्र्याला धक्काबुक्की होते हे चित्र दुसरे काय दर्शवते ? इंदिरा गांधींनी कणखरपणाचा आभास निर्माण केला. विरोधकांना भरडून काढले, स्वपक्षातील नको त्यांना एकमेकांविरुद्ध उठवून बाजूस सारले हे सर्व खरे आहे. पण ही प्रतिमा आहे उद्ध्वस्त करणाऱ्याची ! पक्ष एकसंध करणाराची व चांगल्या राज्याचा तो वाहक बनणाराची नाही ! !

संजय गांधींचा उदय आणि युवक काँग्रेसची उभारणी ही त्याच विध्वंसक प्रवृत्तीची उदाहरणे आहेत. आणीबाणीत संजयचे नेतृत्व वरून

लादण्यात आले. खंबीर मुख्य मंत्र्यांनाही त्याच्यापुढे वाकविण्यात आले. संजयचे आजोबा पं. नेहरू यांच्याबरोबर ज्यांनी काम केले त्यांचाही अपमान संजयकडून करविण्यात आला. संजय व त्याचे अनुयायी यांनी देशातील कायदेकानू, न्यायसंस्था, सभ्यता, संसदेचे पावित्र्य या साऱ्यांची अप्रतिष्ठा केली. श्रीमती इंदिरा गांधींच्या कृपाछत्राखाली हे सर्व घडले. आता संजय गांधी नाही आणि त्याच्या मृत्यूमुळे इंदिराबाईही दुर्बळ झाल्या आहेत. पण या दोघांनी निर्माण केलेल्या प्रवृत्ती अस्तित्वात असून प्रबळ आहेत. काँग्रेसच्या अध्यक्षा या नात्याने या गोष्टींना आवर घालणे इंदिरा गांधींचे कर्तव्य ठरते. पण हे कर्तव्य त्या पार पाडू शकणार नाहीत आणि त्यांची तशी इच्छाही दिसत नाही. अशी किडलेली, विस्कळित, स्वार्थी व सत्तालुटारू संघटना घेऊन इंदिरा गांधी देशाचे भले करू शकतील यावर विश्वास ठेवणे म्हणजे वाळवंटात आम्रवृक्ष बहरेल अशी अपेक्षा बाळगण्यासारखे आहे.

● ●

# दिवाळखोरीकडे वाटचाल

" **अर्थमंत्र्याने** राष्ट्राचा अर्थसंकल्प मांडताना राष्ट्राचा महत्त्वाचा घटक जे सामान्य कुटुंब, त्याच्या अंदाजपत्रकात उलथापालथ होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. " **— पं. दीनदयाळ उपाध्याय**

पं. दीनदयाळ हे केवळ अर्थतज्ज्ञ नव्हते तर ते आर्थिक विचारवंत होते. म्हणून अगदी साध्या उदाहरणाने देशाच्या अर्थमंत्र्याची जबाबदारी अतिशय समर्पक शब्दात त्यांनी मांडली. आपल्या प्राचीन शास्त्रांमधे राजस्वाला गोदोहनाची उपमा देत असत. गायीच्या वासरांचे पोषण व्हावे, तिच्या आरोग्याला धक्का पोचू नये अशा बेताने जसे दूध काढले जाते तसा राज्याचा खजिना भरावा असे पूर्वजांचे सांगणे असे. १९६२ च्या चीनच्या आक्रमणानंतर त्रेसष्ट साली अर्थमंत्री मोरारजीभाईंनी संरक्षण खर्चात वाढ केली, अनेक नवे कर बसविले. सामान्य माणसाच्या घरगुती खर्चात त्यामुळे २५ ते ३० टक्के वाढ झाली असा अंदाज होता. त्यानंतर १९६५ आणि १९७१ या युद्धानंतरही असाच बोजा सामान्य माणसावर पडला. इंदिरा सरकारचे अर्थमंत्री श्री. व्यंकटरमण यांनी जून महिन्यात २८२ कोटी रुपये करवाढीचे व १४१७ कोटी रुपये तुटीचे अंदाजपत्रक मांडले. कर फार नाहीत म्हणून अर्थमंत्र्यांची अनेकांनी स्तुती केली. एका दैनिकाने तर चांगला. अर्थसंकल्प असे वर्णन करणारा अग्रलेख लिहिला आणि चारच दिवसात अर्थसंकल्पाची दुसरी बाजू असा आणखी एक अग्रलेख लिहून टीका केली. तात्पर्य असे की एखाद्या जादूगारासारखे व्यंकटरमणनी आपल्या पोतडीतून सशाचे सुरेख पिल्लू बाहेर काढून दाखविले आणि पहाता पहाता त्याचा अक्राळविक्राळ राक्षस बनून भाववाढीचे भूत लोकांच्या मानगुटीवर बसले. त्यांच्या या अर्थसंकल्पामुळे सामान्य माणसाचे घरगुती खर्च कसे विसकटून गेले असतील हा ज्याच्या त्याच्या अनुभवाचा विषय आहे, परंतु एकही वस्तू अशी नसेल की जिची किंमत वाढलेली नाही. मग अर्थमंत्री कोणताही दावा करोत.

सुप्रसिद्ध घटनापंडित व अर्थतज्ज्ञ श्री. नानी पालखीवाला यांनी या

अर्थसंकल्पानंतर म्हटले आहे की चलनवाढ हा अदृश्य कर असतो आणि संसदेने तो केव्हाही संमत केलेला नसतो. या १५ ते २० टक्के अदृश्य करवाढीचा डोस चालू आर्थिक वर्षात आपणांस गिळावा लागणार आहे.

अर्थमंत्र्यांनी प्रचंड कर बसविले नाहीत, आयकरात सूट दिली इत्यादी गोष्टी खऱ्याच आहेत. पण जनतेची ही एक प्रकारे फसवणूक झाली आहे. कारण या अर्थसंकल्पापूर्वीच २१०० कोटी रुपयांची दरवाढ तेल व पेट्रोलजन्य उत्पादनात झाली. ३०० कोटींची वाढ खतांमध्ये तर २०० कोटींची रेल्वे मालवाहतूक दरांमध्ये. अर्थसंकल्पातील अनेक वस्तूंवरील एक्साईज दरातील वाढीमुळे २०० कोटी रुपये, बँक कर्जावरील व्याजावरील करामुळे १०० कोटी रुपये वाढ अपेक्षित आहे. याचा अर्थ असा की चलन आणि भाववाढ ही कोणीही कितीही आश्वासने दिली व अर्थसंकल्पाची कितीही स्तुती केली तरी अपरिहार्य आहे ही गोष्ट १८ जूनलाच स्पष्ट झाली होती.

वर पेट्रोल व तेल यांच्या दरातील वाढीबद्दल लिहिले आहे. घाऊक दरवाढ सामान्य पातळीपर्यंत येताना अधिक वाढते असा अनुभव आहे. नव्या दराने ५ रु. १० पैसे पेट्रोल, २ रु. २८ पैसे दराने डिझेल आणि लुब्रिकेटिंग ऑईलमधे १ रु. १० पैसे वाढ असे त्याचे स्वरूप प्रत्यक्षात जूनमध्येच झाले आता तर घरगुती गॅस व रॉकेल ही दुर्मिळ गोष्ट झाली आहे. टंचाई व भाववाढ यांचे हे दुष्टचक्र लोकांना पिळून काढीत असून गावोगाव केवळ तेलासाठी प्रचंड रांगा उन्हातान्हात तासन तास लोक लावीत आहेत. पेट्रोलियम मंत्र्यांनी १० जूनलाच सांगून टाकले, 'आयात तेलाच्या किमतीतील यापुढील सर्व वाढ ग्राहकांच्याच माथ्यावर बसेल. या खडतर वस्तुस्थितीची जाणीव प्रत्येक नागरिकाला झाली पाहिजे.' इंदिरा गांधी व त्यांची काँग्रेस यांना विजय मिळाला तेव्हाच खरे म्हणजे पुढील खडतर वस्तुस्थितीची जाणीव प्रत्येक नागरिकाला झाली होती. म्हणून तर '८० टक्के लोकांचा पाठिंबा मिळूनही' जनतेत या विजयाचा आनंद, उत्साह कोठे आढळला नाही, उलट भयकंपिततेची लहर लोकांच्या सर्वांगाला चाटून गेली.

लोक भाववाढीमुळे नागवले जात आहेत, त्यांची गांजणूक होत आहे याची जाणीव राज्यकर्त्यांना असती तर हे दुःखही त्यांनी सहन केले असते. परंतु काँग्रेस सत्ताधाऱ्यांची वागणूक लोकांच्या दुःखावर डागण्या देणारीच

आहे. संजय गांधींना अपघाती मृत्यू आला ही वाईट गोष्ट झाली. परंतु पंतप्रधानांचे हे चिरंजीव देशात इंधनाची टंचाई असताना व ‘ खडतर वस्तुस्थितीची जाणीव ’ पेट्रोलियम मंत्री देत असताना तास तास रोज विमानोड्डाणाची चैन करीत व दहा दहा हजार रुपयांचा दरदिवशी त्यामुळे चुराडा करीत हे कसे काय ? महाराष्ट्राचे मुख्य मंत्री दिल्लीतील खासदारांना डझनावारी मोटारींचे आमीष दाखवीत हे कसे काय ? की त्या गाड्या ८० टक्के लोकांच्या पाठिंब्यावर चालणाऱ्या होत्या, पेट्रोलवर नव्हे ? तेव्हा हे सरकार व त्याचा पक्ष यांना लोकांच्या हालअपेष्टांची पर्वा नाही. संजय गेला तर मनेकाला पुढे आणा, त्या नकोत तर राजीव गांधीला नेता करा अशा फालतू कारणांसाठी देशभरच्या आमदार–खासदारांच्या विमानवाऱ्या दिल्लीत कशा काय चालू होत्या ? इंदिरा गांधींचे सांत्वन करण्याच्या निमित्ताने, पण खरे तर आपल्या राजकारणाचा दबाव आणण्यासाठी संजयमृत्यूनंतर दोन दोन महिन्यांनी शेकडो आमदार आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्रासारख्या राज्यांतून दिल्लीला जात होते हे काय दर्शविते ? श्री. व्यंकटरमण यांनी सरकारी खर्चात कपात करू असे आश्वासन दिले. गेल्या नऊ महिन्यात कोणती कपात केली हे लोक पहातच आहेत. जिथे पक्षसदस्यांना काबूत ठेवता येत नाही तेथे नोकरशाहीवर काटकसरीची सक्ती करता येणे अशक्य आहे.

अर्थमंत्र्यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्था बळकट करून ती सुधारण्यासाठी जोरदार प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते. केंद्रात कंट्रोल रूम सुरू केली आहे व तांदूळ, गहू, वनस्पती, खाद्यतेले, डिझेल, रॉकेल, साखर, कोळसा व मीठ या नऊ वस्तूंचे कार्यक्षम वितरण करू असे सांगितले होते. या आश्वासनानंतर आता ३।। महिने लोटले आहेत. परंतु देशभरात सर्वत्र टंचाई थैमान घालीत आहेत व लोक मोर्चे, निदर्शने, बंदकडे वळत आहेत. कंट्रोल रूम अस्तित्वात आहे की नाही हा प्रश्न पडावा असे दृश्य आहे. गणेशोत्सव गेला व आता दसरा येत आहे आणि मागोमाग दिवाळी. गणेशोत्सवात ऐन चतुर्थीलाही लोकांना साखर मिळाली नाही. दिवाळीत गरम पाण्याची आंघोळ करण्यासाठी तरी रॉकेल मिळेल की नाही याची वानवाच आहे. ही वितरण व्यवस्था की अव्यवस्था ! मात्र सरकारी प्रचार कसा आहे पहा– साखरेचा भाव १४ रुपयांवर गेला तेव्हा नभोवाणी मंत्री

वसंत साठे यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या 'अवघाची संसार' या आकाशवाणीच्या कार्यक्रमातील एक पात्र खाशाबा भाववाढीमुळे त्रासलेल्या कुशाबाला म्हणतो, 'अरे आता प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा सरकारने हातात घेतला आहे. उद्यापासून पहा साखर कशी स्वस्त व मुबलक मिळते ती!' विनोद असा की या कार्यक्रमाच्या दुसऱ्याच दिवशी वर्तमानपत्रात शीर्षक झळकले, "मुंबई-महाराष्ट्रातून साखर गडप!" या साखरेबाबत वितरण यंत्रणा ७ ते १० दिवसांत सज्ज करण्याचा केंद्राचा आदेश राज्यांनी अमलात आणला नाही असा आरोप केंद्रीय मंत्र्यांनीच केला. मग अर्थमंत्र्यांची कंट्रोल रूम काय करत होती? महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाने ३०० रु. क्विंटल भावाने साखर सरकारला देण्याचे जाहीर केले होते. पण सरकारनेच ती नाकारली व मागाहून नॅशनल फेडरेशन ऑफ को–ऑपची साखर ४५० रुपये भावाने खरेदी केली. ही धरसोड वृत्ती सरकारी साखरेचीही भाववाढ होण्यास कारणीभूत झाली. खुद्द राजधानी दिल्लीत २ रु. ८५ पैसे दराने हवी तेवढी साखर उपलब्ध आहे अशी घोषणा दिल्ली प्रशासन करीत होते तेव्हा सुपर बाजारात साखरेचा भाव ९ रु. किलो होता.

इंदिरा गांधींनी सत्ता हाती घेताच केवळ एका महिन्यात चलनवाढीला सुरुवात झाली. फेब्रुवारीमध्ये घाऊक किंमत निर्देशांक २१.९ टक्क्यांनी वाढला. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात तो २२४.८ वरून २२५.२ एवढा वाढला होता. ही सुरुवातीची भाववाढ पुढील वाढीची सूचक होती. शेंगदाणा व तत्सम तेलबियात २९.८%, खाण्याच्या तेलात ३१.१%, खाद्यान्नात ६०.६% वाढ झाली तर साखर दुप्पट म्हणजे ९७.८ टक्के वाढली. धान्ये ११ टक्के व डाळी १४.४% वाढल्या. ही वाढ म्हणजे चरणसिंग राजवटीची फळे म्हणता येण्यासारखे असले तरीही सर्व २१.९ टक्क्यांची वाढ होऊनही भाववाढीला आळा घालू असा दावा सरकार करीतच होते. या दाव्याला प्रत्यक्षात अर्थच नव्हता. कारण शेती उत्पादनात १ कोटी टनांची तूट येईल असा अंदाज अर्थसंकल्पपूर्व पहाणीतच व्यक्त झाला होता. खरीप व रब्बी उत्पादन १२ कोटी टन होईल, सरकारजवळील साठे १ कोटी ७० लक्ष टना एवढेच आहेत व शेंगदाणा उत्पादनात ५ ते ६ टक्के तूट येईल अशी या आढाव्याची गोळाबेरीज. मग सरकारचा दावा लोकांची फसवणूक नव्हे तर काय? तरीही

ऑगस्ट अखेरपर्यंत अर्थमंत्री मद्रास, मुंबई, अहमदाबाद आदी ठिकाणच्या भाषणातून चलनफुगवटा व भाववाढ रोखण्यात सरकारला लवकरच यश येईल अशा घोषणा करीत होते.

वर फेब्रुवारीतील घाऊक किंमतीचा निर्देशांक दिला आहे. जुलै महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात हा निर्देशांक २५८.२ वर गेला. म्हणजे अधिकारावर आल्यापासून सात महिन्यात इंदिरा सरकारने भाववाढ रोखण्याच्या घोषणा व नवे नवे कायदे हातात घेण्याव्यतिरिक्त काहीही केले नाही. सध्याची ही भाववाढीची गती कमी न होता वाढेल व वर्षअखेरपर्यंत आणखी २०–२५ टक्के भाववाढ होईल हे लोकांनी समजून घेतले पाहिजे. तेलाची आयात करावी लागते व अरब राष्ट्रांनी तेलभाव वाढविले म्हणजे येथील अर्थव्यवस्थेवर ताण पडतो हे खरे आहे. परंतु ही भाववाढ काय इंदिरा सरकार आले म्हणजेच होते ? जनता व चरणसिंग यांच्या कारकीर्दीतही तेलाचे भाव वाढलेच होते. परंतु जनता सरकारने त्याची झळ लोकांना लागू दिली नाही. सर्व वस्तू मुबलक व ग्राहकांना परवडतील अशा किमतीत मिळत होत्या. अगदी आणीबाणीत होते त्याहीपेक्षा वस्तूंचे भाव जनता राजवटीत कमी होते. रेशन कार्ड आपणाकडे आहे याची आठवणही लोक विसरले होते. आताही ते कार्डाची आठवण विसरतील, कारण कार्ड घेऊन दुकानावर गेले तर वस्तू मिळतीलच याची खात्री नाही ! ते असले काय वा नसले काय, टंचाई आणि महागाई त्याचा घास गिळण्यास तयार आहेच.

ही जी भाववाढ होत आहे त्याला विधानसभा निवडणुकीनंतर राज्य सरकारांनी सरकारी नोकरांच्यावर महागाई भत्तावाढीची केलेली खैरात, सर्वच राज्यांचे तुटीचे अर्थसंकल्प व शेतकरी आणि झोपडपट्टीवासी यांच्यावर चालू केलेली सवलतींची खैरातही कारणीभूत आहेत. संपूर्ण देशात केंद्राला व राज्यांना आर्थिक शिस्त उरलेलीच नाही. महाराष्ट्रात ४९कोटींची कर्जे माफ होतात व रिझर्व बँकेवर दडपण आणले जाते. कर्नाटकात ८५ कोटी रुपयांच्या वसुलीवर मुख्य मंत्री गुंडूराव पाणी सोडतात, केरळात शेतकऱ्यांना व बेकार मजुरांना पेन्शनपायी कोटयवधी रुपये खर्च केले जातात हीही कारणे भाववाढीच्या मुळाशी आहेत. सर्व राज्यांचे वीज प्रकल्प

तोटयात आहेत आणि पुरेशा क्षमतेने उत्पादन तेथे होत नाही. वीजनिर्मिती केन्द्रात (सरकारी) ४० टक्के उत्पादन होते व टाटांसारख्या खाजगी केन्द्रात ९० टक्के उत्पादन होते हे राज्य कार्यक्षमतेने चालल्याचे लक्षण नव्हे.

इंदिरा गांधी आणि त्यांचे मंत्री जुन्या जनता सरकारला दोष देतात. तीच तीच रेकॉर्ड ऐकून कंटाळा येतो तसे ही कारणे ऐकून झाले आहे. पण जागतिक बँकेने आपल्या अहवालात या सरकारांची अप्रत्यक्ष स्तुती केली आहे. "१९७९–८० या वर्षांत दुष्काळामुळे अर्थव्यवस्था बिघडली तरी या वाईट हवामानाने भारतीय अथव्यवस्थेचे सामर्थ्यही प्रकट केले. तीव्र दुष्काळी परिस्थितीतही ११·८० कोटी टन धान्योत्पादन झाले. शेतीसुधारणा व पाणी व्यवस्थेला याचे श्रेय आहे." असे हा अहवाल नमूद करतो. इंदिरा गांधींच्या प्रचाराला ही परस्पर चपराकच होय.

नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च (NCAER) ही संस्था नव्या सरकारविषयी आता काय म्हणते पहा. पहिल्या तिमाहीचा– जानेवारी ते मार्च – आढावा घेऊन किमतवाढ होत राहणार असा अंदाज व्यक्त करताना संस्था म्हणते :

"कोळसा आणि वीज स्थितीत थोडीशी सुधारणा दिसली तरी औद्योगिक उत्पादनात ढिलाईच आहे. याचे मुख्य कारण परस्परांचे अपुरे सहकार्य, औद्योगिक कच्च्या मालाचा तुटवडा, औद्योगिक संबंधाची ढासळती स्थिती आणि काही प्रमाणात पतपुरवठयावरील निर्बंध. महागाई भत्त्याचे जादा हप्ते देण्यात येत आहेत हे पाहिल्यावर भाव कमी होतील याची शंकाच आहे."

जाता जाता इंदिराबाईंच्या कॉंग्रेस सरकारने आपल्या ११ वर्षांच्या कारकीर्दीत व त्यापूर्वीच्या कॉंग्रेस सरकारांनी देश कसा दिवाळखोर बनविला त्याची दोन उदाहरणे पाहू. सर्व कॉंग्रेस सरकारांनी परदेशांकडून कर्जे घेण्याचा सपाटा सालोसाल चालविला. परिणामी भारताच्या शिरावर परकीय कर्जाचा प्रचंड बोजा पडला आहे. भारतातील प्रत्येक माणूस आज विदेशांचा देणेकरी असून प्रत्येकाच्या डोक्यावर २०० रु. कर्ज आहे.

आपल्या भारतीय रुपयाची ग्राहक निर्देशांकाच्या संदर्भात खरी किंमत

किती ? १९४७ हे पायाभूत वर्ष धरले तर ही घसरण खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १९४७ | १००.०० पैसे |
| १९६७ | ४१.६३ ,, |
| १९७१ | ३७.८३ ,, |
| १९७७ | २२.३१ ,, |
| १९८० | १९.१६ ,, |

ही शेवटची घसरण इंदिराबाई पंतप्रधान झाल्यावरील पहिल्या पाच महिन्यांतील आहे. आता आपल्याला मिळणाऱ्या प्रत्येक रुपयाची किंमत २० पैशांहूनही कमी आहे. नव्या राजवटीचे हे प्रचंड आर्थिक यश पाहून कोणाचेही डोळे दिपावेत.

● ●

# सत्तालोलुपांचा कारभार

"**पक्षाचे** उमेदवार तुमच्या आवडीचे असले पाहिजेत, तसेच संघटणेचे नियम तुमच्या हिताला पोषक असतील तेव्हाच विशिष्ट व्यक्ती व गट यांना लागू करावेत आणि तुमचे हित साधणार नसेल तेव्हा त्याकडे दुर्लक्ष करावे; अशी तुमची वृत्ती दिसते......

"......काँग्रेस आणि राष्ट्र यांच्याशी निष्ठा म्हणजे तुमच्याशी निष्ठा......जे तुमचा उदो उदो करतील ते तुमच्या लेखी पुरोगामी, परंतु संघटणा आणि तिची धोरणे यांच्याशी ज्यांची निष्ठा ते प्रतिगामी व निष्ठाशून्य असे तुम्हाला वाटते. नभोवाणीचे प्रभावी माध्यम आणि वृत्तपत्रांवरील सरकारचा प्रभाव यांचा उपयोग अशा लोकांची प्रतिमा प्रतिगामी म्हणून रंगविण्यासाठी करण्यात येतो. सरकारी माध्यमांचा उपयोग बराकीकरण व व्यक्तिगत निष्ठा निर्माण करण्यासाठी मुक्तपणे करण्यात येत आहे. तुमच्या व्यक्तिगत आवडीनिवडी आणि तुमची मतें यांशी थोडासासुद्धा मतभेद आहे अशांना सरकार व पक्ष यांत यत्किंचितही स्थान नाही अशी समजूत त्यामुळे बळावत आहे.

"......या प्रकारच्या पद्धतीची परिणती पक्ष आणि सरकारमधे 'एका व्यक्तीची सत्ता' अशा स्वरूपात होईल अशी माझी अटकळ आहे. लोकशाही व समाजवाद यांना त्यामुळे बळ मात्र मिळणार नाही..."

**--श्री. निर्जलिंगप्पा** (१९६९)

काँग्रेस प्रथम फुटली तेव्हा निर्जलिंगप्पा अध्यक्ष होते व इंदिरा गांधी आणि त्या वेळची 'सिंडिकेट' यांच्या वादात निर्जलिंगप्पांनी बाईंना लिहिलेल्या पत्रातील वरील परिच्छेद आहेत. इंदिरा गांधींच्या कारकीर्दीचे 'देदीप्यमान दशक' सुरू होऊन तेव्हा तीन वर्षे उलटत आली होती आणि श्री. निर्जलिंगप्पा यांची भविष्यवाणी पुढे सहा वर्षांनी शब्दशः खरी ठरली. इंदिराबाई आणि त्यांची काँग्रेस यांच्या सत्ता राबवण्याच्या पद्धतीचा विचार याच संदर्भात करणे त्यामुळे अपरिहार्य ठरते. राष्ट्र, समाज, लोकशाही, स्वातंत्र्य, आर्थिक स्वावलंबन आदी सर्व गोष्टी इंदिरा गांधींच्या 'एका

व्यक्तीची सत्ता ' तत्त्वापुढे गौण ठरतात.

या एकमुखी सत्तेच्या हव्यासापायीच नऊ राज्य विधानसभा बरखास्त करण्याचा निर्णय इंदिरा गांधी सत्तेवर येऊन पाच आठवडे उलटण्याच्या आत नेहमीप्रमाणे मध्यरात्री करण्यात आला. राष्ट्राध्यक्षांच्या हुकमात बरखास्तीचे कारणच देण्यात आलेले नाही, केवळ घटनेच्या ३५६ कलमान्वये मिळालेल्या अधिकाराचा हवाला देण्यात आला. राज्यांची मुदत संपण्यास दोन वर्षे होती, पण तेवढी वाट पहाणे सत्तालोलुपांना जमणारे नव्हते.

निवडणूक निकाल इंदिरा गांधींच्या बाजूने लागले त्याची चिकित्सा मागे केली आहे.नवे सर्व मुख्य मंत्री एकजात श्रीमती गांधी व कै. संजय गांधी यांच्याशी किती निष्ठा ठेवतात याच निकषावर निवडले गेले. त्यांची कार्यक्षमता, अनुभव, कुवत, संघटणेतील स्थान वा प्रशासकीय कुशलता यांचा विचार मुळीच झाला नाही. परिणामी सर्व काँग्रेसी राज्यांत आज सरकारचे अस्तित्व जाणवत नाही अशी स्थिती आहे.

हे नवे सुभेदार म्हणजे काय नमुने आहेत याची मासलेवाईक उदाहरणे पहाता येतील. ओरिसाचे मुख्य मंत्री जे. बी. पटनाईक यांनी नवी योजना जाहीर केली त्यानुसार ते रोज एक कोटी रुपये याप्रमाणे हजार दिवसांत एक हजार कोटी रुपये ग्रामीण विभागात ओतणार आहेत. पाच वर्षात पाच हजार कोटींची भांडवल गुंतवणूक करण्याचा पटनाईकांचा मानस आहे. भांडवल गुंतवणूक करणार, पण कारखानदारी, त्यासाठी कच्चा माल, दळणवळणाची साधने, रस्ते, कामगार, वीजपुरवठा इत्यादी घटकांचा मात्र पटनाईकांच्या योजनेत विचार नाही. आणि हे एवढे पैसे त्यांना देणार कोण ? त्यांचे अंदाजपत्रक तुटीचे, सरकारी नोकरांना महागाई भत्ता देणार, १८ लाख लोकांना रोजगार देणार आणि ओलिताखालील जमीन दुपटीने वाढवणार. हे शक्य नाही, पण घोषणांच्या पावसाने लोकांना ओलेचिंब करणे शक्य आहे. पटनाईक हे संजय गांधींच्या विश्वासातील. ते कलमी घोषणा उगवीत आहेत एवढेच.

महाराष्ट्राचे मुख्य मंत्री अंतुले यांच्याएवढा गरिबांचा पुळका इंदिरा

गांधींनाही नसेल. त्यांनी ४९ कोटी रुपयांची शेतकऱ्यांची कर्जे सरळ माफ करून टाकली व रिझर्व्ह बँकेला दम भरला. आता रिझर्व्ह बँकेचे अध्यक्ष डॉ. पटेल म्हणतात, ' कर्जफेड करण्याची ज्यांची ऐपत आहे अशा मोठ्या शेतकऱ्यांचेच प्रमाण थकबाकीदारांत जास्त असल्याचे दिसते.' पण अंतुल्यांना ते गरीब वाटतात व त्यासाठी त्यांनी केन्द्रीय अर्थमंत्र्यांबरोबर भांडण केले. १५ कोटी माफ करावेत व उरलेले १० वर्षांत फेडावेत अशी योजना व्यंकटरमण यांनी सुचविली. अंतुले बहाद्दर. ते म्हणतात, " मी अर्थमंत्र्यांसमोरील कागद उचलला व त्यावर राजीनामा लिहून पुढे ठेवला. म्हणालो, ' गरीब शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा शब्द दिला तो पाळता येत नसेल तर राजीनामा देणे इष्ट. हा इंदिरा गांधींना नेऊन द्या.' त्यांनी तो घेतला नाही व माझी कर्जमाफीची योजना मंजूर झाली." धन्य मुख्यमंत्री व धन्य अर्थमंत्री. त्यांना चलनवाढ भाववाढीची चिंता नाही की राज्याच्या दिवाळखोरीची ! गरिबांसाठी केवढी ही तळमळ !

राजस्थानच्या पहाडियांना मंत्रिमंडळाच्या यादीसकट राज्याचे सर्व प्रश्न दिल्लीत जाऊनच सोडावयाची सवय आहे. खरे कारण त्यांना राज्य करता येत नाही व पक्षबांधवांचा पाठिंबा नाही. बिहारचे मुख्य मंत्री डॉ. जगन्नाथ मिश्रा यांना बिहारच्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांची बेशिस्त दूर करण्यासाठी एकापाठोपाठ एक पाच वटहुकूम काढावे लागतात हे पाहिले म्हणजे हे राज्य पेंढाऱ्यांचे आहे की काय असे वाटू लागते. बिहारच्या सार्वजनिक जीवनातच इतके अराजक आहे की अशा शेकडो वटहुकमांनीही काम भागणार नाही. शिवाय असे वटहुकूम काढून राज्य चालविणे म्हणजे राज्य चालविण्यास आपण नालायक असल्याचे सिद्ध करणेच होय.

मध्यप्रदेशाच्या अर्जुनसिंगांच्या कारभाराची एकच झलक पुरेशी आहे. त्यांनी राज्यातील ५० हजारांवर कर्मचाऱ्यांच्या बदल्या लेखणीच्या फरकाऱ्यासरशी केल्या. प्रत्येक काँग्रेस आमदाराला पाच कर्मचाऱ्यांच्या बदलीची सवलत होती. यात एकाने सुचविलेल्या बदल्या दुसऱ्याने रद्द करण्याचेही प्रकार असंख्य घडले. या बदल्यांच्या प्रवासभत्त्यापायी दीड कोटी रुपयांचा खार राज्याला बसला. मध्यप्रदेशने ४३·५५ कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प संमत केला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या बायकांनी या बदल्या रद्द कराव्यात

यासाठी भोपाळात धरणे धरून कारभारच बंद पाडला. अशा स्थितीत हे राज्य चालले (?) आहे.

याच मुख्य मंत्र्यांनी वैद्यक व इंजिनीअरिंग महाविद्यालयातील प्रवेशासाठी मार्कांची असलेली अट मागास व हरिजन विद्यार्थ्यांपुरती रद्द करून टाकली आहे. पूर्वी ४५ टक्क्यांवरून ती २० टक्क्यांवर आणली व आता रद्दच केली. तेव्हा अशा वर्गातील विद्यार्थ्याने नापास होऊन ५-१० टक्के मार्क मिळविले तरी तो डॉक्टरी व इंजिनीअरिंग शिक्षण घेऊ शकेल. पुढे हे विद्यार्थी तेथे नापास झाले तरी त्यांना पास करण्यात येणारच नाही असे नाही. सवंग लोकप्रियतेसाठी राज्य कसे चालविले जात आहे याचा हा नमुना.

कर्नाटकाच्या गुंडूरावांनी मलप्रभा धरणाच्या प्रभावाखालील शेतकऱ्यांवर लावलेल्या शेती सुधारकर, पाणीपट्टी वगैरेविरुद्ध लोकांनी चळवळ केली व गोळीबारापर्यंत पाळी आली. गुंडूराव असले तरी उग्र चळवळीला ते घाबरले व पुढील भाववाढ विरोधी आंदोलनाची हवा काढून घेण्यासाठी महाराष्ट्रात जशी कर्जमाफी दिली तशी गुंडूरावांनी ८५ कोटी रुपयांच्या सवलती आंदोलनाच्या परिणामी जाहीर केल्या. कर्नाटकाच्या बजेटमध्ये ८२·३८ कोटी रुपयांची तूट आहे व १३·१६ कोटींचे नवे कर आहेत. आता ८५ कोटींची ही नवी फोडणी इंदिरा सरकारने लोकांना दिली आहे.

श्रीमती इंदिरा गांधींनी आपल्या मुख्य मंत्र्यांची बैठक घेऊन तुम्ही नीट कारभार करा, लोकप्रियतेच्या आहारी जाऊ नका, राज्य करता हे दिसले पाहिजे वगैरे उपदेश केला आहे. पण खुद्द दिल्लीच्या आडातच नाही ते राज्यांच्या पोहऱ्यात कोठून येणार? केंद्र सरकार तरी राज्य करते आहे असे कोठे दिसते आहे? कार्यक्षमता, कारभारकौशल्य, तांत्रिक, आर्थिक व व्यावहारिक ज्ञान यांचा सर्वत्र अभाव असताना केंद्रात वा राज्यांत कारभार चालणार तरी कसा? इंदिरानिष्ठा व संजयनिष्ठा हीच जेथे सत्ता सुपूर्द करताना कसोटी पाहिली तेथे आता पस्तावा करून किंवा उपदेशाचे घोट पाजून काम होणार नाही.

कारभार करता येईनासा झाला की कोणतेही सरकार नवे नवे कायदे हातात घेते. केंद्र व राज्य सरकारांनी हेच धोरण अवलंबिले आहे. काश्मीरमध्ये वटहुकूम निघाला, गुजरातमध्ये निघाला, मध्यप्रदेश व महाराष्ट्रानेही

गांधींनाही नसेल. त्यांनी ४९ कोटी रुपयांची शेतकऱ्यांची कर्जे सरळ माफ करून टाकली व रिझर्व्ह बँकेला दम भरला. आता रिझर्व्ह बँकेचे अध्यक्ष डॉ. पटेल म्हणतात, 'कर्जफेड करण्याची ज्यांची ऐपत आहे अशा मोठ्या शेतकऱ्यांचेच प्रमाण थकबाकीदारांत जास्त असल्याचे दिसते.' पण अंतुल्यांना ते गरीब वाटतात व त्यासाठी त्यांनी केन्द्रीय अर्थमंत्र्यांबरोबर भांडण केले. १५ कोटी माफ करावेत व उरलेले १० वर्षांत फेडावेत अशी योजना व्यंकटरमण यांनी सुचविली. अंतुले बहाद्दर. ते म्हणतात, "मी अर्थमंत्र्यांसमोरील कागद उचलला व त्यावर राजीनामा लिहून पुढे ठेवला. म्हणालो, 'गरीब शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा शब्द दिला तो पाळता येत नसेल तर राजीनामा देणे इष्ट. हा इंदिरा गांधींना नेऊन द्या.' त्यांनी तो घेतला नाही व माझी कर्जमाफीची योजना मंजूर झाली." धन्य मुख्यमंत्री व धन्य अर्थमंत्री. त्यांना चलनवाढ भाववाढीची चिंता नाही की राज्याच्या दिवाळखोरीची ! गरिबांसाठी केवढी ही तळमळ !

राजस्थानच्या पहाडियांना मंत्रिमंडळाच्या यादीसकट राज्याचे सर्व प्रश्न दिल्लीत जाऊनच सोडावयाची सवय आहे. खरे कारण त्यांना राज्य करता येत नाही व पक्षबांधवांचा पाठिंबा नाही. बिहारचे मुख्य मंत्री डॉ. जगन्नाथ मिश्रा यांना बिहारच्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांची बेशिस्त दूर करण्यासाठी एकापाठोपाठ एक पाच वटहुकूम काढावे लागतात हे पाहिले म्हणजे हे राज्य पेंढाऱ्यांचे आहे की काय असे वाटू लागते. बिहारच्या सार्वजनिक जीवनातच इतके अराजक आहे की अशा शेकडो वटहुकमांनीही काम भागणार नाही. शिवाय असे वटहुकूम काढून राज्य चालविणे म्हणजे राज्य चालविण्यास आपण नालायक असल्याचे सिद्ध करणेच होय.

मध्यप्रदेशाच्या अर्जुनसिंगांच्या कारभाराची एकच झलक पुरेशी आहे. त्यांनी राज्यातील ५० हजारांवर कर्मचाऱ्यांच्या बदल्या लेखणीच्या फरकाऱ्यासरशी केल्या. प्रत्येक काँग्रेस आमदाराला पाच कर्मचाऱ्यांच्या बदलीची सवलत होती. यात एकाने सुचविलेल्या बदल्या दुसऱ्याने रद्द करण्याचेही प्रकार असंख्य घडले. या बदल्यांच्या प्रवासभत्त्यापायी दीड कोटी रुपयांचा खार राज्याला बसला. मध्यप्रदेशने ४३·५५ कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प संमत केला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या बायकांनी या बदल्या रद्द कराव्यात

यासाठी भोपाळात धरणे धरून कारभारच बंद पाडला. अशा स्थितीत हे राज्य चालले (?) आहे.

याच मुख्य मंत्र्यांनी वैद्यक व इंजिनीअरिंग महाविद्यालयातील प्रवेशासाठी मार्कांची असलेली अट मागास व हरिजन विद्यार्थ्यांपुरती रद्द करून टाकली आहे. पूर्वी ४५ टक्क्यांवरून ती २० टक्क्यांवर आणली व आता रद्दच केली. तेव्हा अशा वर्गातील विद्यार्थ्याने नापास होऊन ५-१० टक्के मार्क मिळविले तरी तो डॉक्टरी व इंजिनीअरिंग शिक्षण घेऊ शकेल. पुढे हे विद्यार्थी तेथे नापास झाले तरी त्यांना पास करण्यात येणारच नाही असे नाही. सवंग लोकप्रियतेसाठी राज्य कसे चालविले जात आहे याचा हा नमुना.

कर्नाटकाच्या गुंडूरावांनी मलप्रभा धरणाच्या प्रभावाखालील शेतकऱ्यांवर लावलेल्या शेती सुधारकर, पाणीपट्टी वगैरेविरुद्ध लोकांनी चळवळ केली व गोळीबारापर्यंत पाळी आली. गुंडूराव असले तरी उग्र चळवळीला ते घाबरले व पुढील भाववाढ विरोधी आंदोलनाची हवा काढून घेण्यासाठी महाराष्ट्रात जशी कर्जमाफी दिली तशी गुंडूरावांनी ८५ कोटी रुपयांच्या सवलती आंदोलनाच्या परिणामी जाहीर केल्या. कर्नाटकाच्या बजेटमध्ये ८२·३८ कोटी रुपयांची तूट आहे व १३·१६ कोटींचे नवे कर आहेत. आता ८५ कोटींची ही नवी फोडणी इंदिरा सरकारने लोकांना दिली आहे.

श्रीमती इंदिरा गांधींनी आपल्या मुख्य मंत्र्यांची बैठक घेऊन तुम्ही नीट कारभार करा, लोकप्रियतेच्या आहारी जाऊ नका, राज्य करता हे दिसले पाहिजे वगैरे उपदेश केला आहे. पण खुद्द दिल्लीच्या आडातच नाही ते राज्यांच्या पोहऱ्यात कोठून येणार ? केंद्र सरकार तरी राज्य करते आहे असे कोठे दिसते आहे ? कार्यक्षमता, कारभारकौशल्य, तांत्रिक, आर्थिक व व्यावहारिक ज्ञान यांचा सर्वत्र अभाव असताना केंद्रात वा राज्यांत कारभार चालणार तरी कसा ? इंदिरानिष्ठा व संजयनिष्ठा हीच जेथे सत्ता सुपूर्द करताना कसोटी पाहिली तेथे आता पस्तावा करून किंवा उपदेशाचे घोट पाजून काम होणार नाही.

कारभार करता येईनासा झाला की कोणतेही सरकार नवे नवे कायदे हातात घेते. केंद्र व राज्य सरकारांनी हेच धोरण अवलंबिले आहे. काश्मीरमध्ये वटहुकूम निघाला, गुजरातमध्ये निघाला, मध्यप्रदेश व महाराष्ट्रानेही

त्यापाठोपाठ वटहुकूम काढले. केंद्र सरकारने प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा हातात घेतला, फौजदारी कायद्यात दुरुस्ती करून वटहुकूम काढला, या साऱ्याचा अर्थ काय आहे? अर्थ असा की तथाकथित 'प्रचंड बहुमत' व 'लोकांचा पाठिंबा' मिळूनही केंद्र व राज्य सरकारे लोकांना घाबरत आहेत. जनतेचा असंतोष वाढत आहे व तो उग्र रूप धारण करणार हे या धूर्तांनी ओळखले आहे. वेळ आली तर जनतेला भरडून काढावे यासाठी ही सारी आयुधे आधीच हातात घेतलेली बरी. आणीबाणीपूर्वी लोकांच्या प्रचंड सभा, उग्र निदर्शने वारंवार होत असत. कारण जनता राजकीय व आर्थिक भ्रष्टाचार, वशिलेबाजी, दमदाटी यांनी संतापली होती. आणीबाणीने कहर केला. इंदिरा गांधींनी 'राष्ट्राला ही कडू गोळी समाजाची प्रकृती बरी करण्यासाठी देत आहे' असे म्हटले. जनतेने कडू गोळी पचविली व वेळ आली तेव्हा उद्दाम राज्यकर्त्यांना भिरकावून दिले. पण इंदिरा गांधी व काँग्रेस त्यापासून काही शिकलेल्या दिसत नाहीत. अधिकाधिक अधिकार त्या हातात घेतच आहेत.

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सुरक्षा वटहुकमाने राष्ट्रीय सुरक्षेला बाधा येईल असे कृत्य कोणी करीत असेल वा करण्याच्या विचारात असेल तर त्याला प्रतिबंध करण्याचा इरादा जाहीर केला आहे. यात जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यात वा वाटपात अडथळा आणणाऱ्याविरुद्ध उपाययोजना करता येईल. अटक केलेल्या व्यक्तीस पाच दिवसांच्या मुदतीत अटकेची कारणे सरकारला सांगावी लागतील. कमाल १२ महिने स्थानबद्ध करता येईल व हायकोर्टाच्या न्यायाधीशाच्या योग्यतेच्या तीन सदस्यांची समिती एक वर्षानंतर स्थानबद्धाच्या प्रकरणाचा फेरविचार करू शकेल. फौजदारी कायद्यातील दुरुस्तीप्रमाणे कलम १५३ (राष्ट्रीय एकात्मतेला बाधा) व कलम ५०५ च्या पोटकलम २ व ३ अन्वये (धर्म, जाती, भाषिक गट यांमध्ये वैर निर्माण करणे) खटले भरता येतील व खटले भरण्यात होणारी दिरंगाई टाळण्यात येईल. महाराष्ट्राच्या प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याने जातीय तणाव, समाजद्रोही कारवाया, काळाबाजार इत्यादींस चिथावणी देणाऱ्यांना ६ महिने स्थानबद्ध वा हद्दपार करण्याची तरतूद आहे. सध्याच्या कायद्यातील तरतुदी अपुऱ्या असल्याने हे सर्व नवे वटहुकूम हाती घेण्यात आले अशी

सरकारने सर्वसाधारण दिलेली कारणे आहेत.

सरकारच्या या कारणांची चिकित्सा करण्याचीही जरुरी नाही एवढी ती भोंगळ आहेत. वर म्हटल्याप्रमाणे खरे कारण सरकार घाबरले आहे व लोकांना घाबरवण्याचा ते प्रयत्न करीत आहे एवढेच आहे. राजकीय विरोधकांना व स्वतःच्या सत्तेला जेथून धोका निर्माण होईल अशांना ठोकून काढण्यासाठीच या वटहुकुमांचा उपयोग होणार आहे हे पूर्वानुभवावरून सिद्ध होते. ७७ सालापूर्वी सरकारने मिसा हातात घेतला तेव्हा याचा उपयोग विरोधी पक्षांसाठी करणार नाही असे वारंवार आश्वासन इंदिरा गांधींसकट सर्व मंत्र्यांनी दिले होते. प्रत्यक्षात मिसाखाली हजारो राजकीय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व सामान्य नागरिक यांना तुरुंगात जावे लागले. कायद्याच्या हेतूपेक्षा कायदा जे वापरतात त्यांचा हेतू महत्त्वाचा ठरतो. इंदिरा काँग्रेसच्या सरकारांचा हेतू शुद्ध नाही एवढी खूणगाठ लोकांनी आपल्या मनाशी केव्हाच बांधली आहे.

नव्या सरकारच्या राजवटीत न्यायालयांनी चांगली भूमिका घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाने घटनेचे ५५ वे कलम रद्द ठरविले, गुजरात उच्च न्यायालयाने गुजरात सरकारला स्थानबद्धांच्या खटल्यात चपराक दिली. जनता सरकारने नेमलेली खास न्यायालये रद्द करतानाही न्यायमूर्तींनी निकालपत्रात अधिक गतीने काम चालले असते तर न्यायाचा खेळखंडोबा झाला नसता असा अभिप्राय दिला. या सर्व दिलासा देणाऱ्या घटना आहेत. तथापि केंद्रीय कायदेमंत्र्यांपासून महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्यांपर्यंत सर्वजण न्यायालयांवर पुन्हा एकदा तुटून पडले आहेत याची दखल घेणे आवश्यक आहे. न्यायालये श्रेष्ठ की संसद सार्वभौम हा जुना वाद इंदिरा सरकारने पुन्हा उकरून काढला असून न्यायालयांना वेसण घालण्यासाठी सरकारचे हात शिवशिवत आहेत हे त्यांच्या वक्तव्यांवरून स्पष्ट झालेले आहे. इंदिरा सरकारपुढे दोन मोठे प्रश्न आहेत. एक विरोधी पक्ष असंतोष संघटित करीत आहेत त्याचा व दुसरा न्यायालयांचा. पैकी विरोधकांना वेगवेगळ्या वटहुकमांनी दाबता येईल अशी तरतूद केलेली आहे व सर्वोच्च न्यायालयाशी संघर्ष करण्याचा पवित्रा इंदिरा सरकारने घेतला आहे. पुन्हा एकदा राज्यसत्ता आणि लोकशक्ती व न्यायसत्ता यांचा झगडा होणार याची स्पष्ट चिन्हे

इंदिरा सरकारच्या नऊ महिन्यांच्या कारभाराने दिसू लागली आहेत. गरिबांचा व लोककल्याणाचा मोठा गाजावाजा करून सत्तेवर आलेल्या इंदिरा गांधी व त्यांचा पक्ष हतबल, किंकर्तव्यमूढ व म्हणूनच पिसाळण्याच्या अवस्थेत आलेला दिसत आहे.

● ●

# पेंढाऱ्यांची राज्यव्यवस्था

" ब्रिटिश राज्यात राज्यकर्त्यांचे हित पहाणे ही दृष्टी होती ती स्वराज्यातही बदललेली नाही. विस्तृत प्रमाणावर तोच तोच प्रकार अजूनही चालू आहे.

" राजकीय प्रभावामुळे पोलिसखाते अधिकाधिक भ्रष्ट होत आहे. राजकारणी 'बॉस'ला खूष करण्यासाठी अयोग्य गोष्टी जर पोलिसाला करणे भाग पाडले जात असेल तर स्वतःच्या व्यक्तिगत स्वार्थासाठी बेकायदेशीर कृत्य त्याने का करू नये ?

" भ्रष्टाचाऱ्याला बढती मिळते व प्रामाणिक पोलिसाला हैराण करून बदलीची टांगती तलवार त्याच्या डोक्यावर सतत ठेवली जाते. सध्याचे वातावरण विषावत आहे."

" राजकीय पालकत्व असेतोवर भ्रष्टाचारी पोलिसाला शिक्षा मिळणे कठीण आहे. वरिष्ठ अधिकाऱ्याकडून आणि मंत्र्याकडूनही लेखी हुकूम मिळविल्यावरच कृती करण्याचा नियम केल्यास भ्रष्टाचाराला काही प्रमाणात आळा बसू शकेल."

**—— नॅशनल पोलिस कमिशन रिपोर्टातून**

कायदा व सुव्यवस्थेचा विचार करताना त्याचा जो रक्षक पोलिस त्याचा विचार करणे आवश्यक आहे. वरील रिपोर्टात पोलिस भ्रष्ट आणि कर्तव्यच्युत होण्यास राजकारणीच जबाबदार आहेत असे स्पष्ट म्हटले आहे. हा अहवाल गेल्या फेब्रुवारी महिन्यात गृहखात्यास सादर करण्यात आला. स्वातंत्र्यानंतर तीस वर्षे काँग्रेसचेच राज्य आहे म्हणून देशातील कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडण्यास काँग्रेसी राजकारणीच जबाबदार आहेत हे उघड आहे.

जनता सरकारच्या कारकीर्दीत लोकांना जीवाचे भय वाटत असे, बायकांना रात्री बाहेर पडणे कठीण जात असे, कोणाची चीजवस्तू सुरक्षित नव्हती असा आक्रोश इंदिरा गांधी व त्यांची काँग्रेस यांनी चालविला होता. आता बाईंचे राज्य नऊ महिन्यांचे झाले. परिस्थितीत कोणता फरक पडला आहे ? राज्यसभेत गृहराज्यमंत्री श्री. योगेंद्र मकवाना यांनी सय्यद शहाबुद्दीन

यांच्या प्रश्नाला दिलेले उत्तर पहा – "जानेवारी ते मे १९८० या पाच महिन्यात १८९ सांप्रदायिक दंगे झाले. १५० माणसे मेली, ९८८ जखमी झाली व एकूण ४५ लाख ५० हजार लोकांना या ना त्या स्वरूपात हानी सोसावी लागली."

हे पाच महिन्यांतील प्रमाण आहे. सरासरी काढावयाची तर वर्षाला इंदिरा राज्यात ४५६ दंगे होतात असे म्हणता येईल. जनता राज्यात हे प्रमाण १८८ होते. १९७८ मध्ये २१९ दंगे झाले. इंदिराबाई सत्तेवर आल्यावर दंगे बंद वा कमी न होता गुंडांना रान मोकळे मिळाले असा याचा अर्थ होतो.

सांप्रदायिक हा जरा उच्च शब्द झाला. खरे म्हणजे मुसलमानांचे दंगे हे साधे सर्वांना समजण्यासारखे नाव. मोरादाबादेतील दंग्यात एका दिवसात १०५ माणसे मेली. असे यापूर्वी कधीही झालेले नव्हते. काश्मीरात सोपोर, दिल्ली, उत्तर प्रदेशात रामपूर, मोरादाबाद, संथळ, मध्य प्रदेशात महू, गुजरातेत अहमदाबाद, महाराष्ट्रात कल्याण आदी ठिकाणी दंगे झाले व माणसे मेली. अलीगढ व मोरादाबाद येथील दंगे लहानमोठ्या स्वरूपात महिना उलटला तरी चालूच होते व मुख्य मंत्री राजीनामा देण्यास निघाले होते. जनता राज्यात अलीगढला दंगल झाली त्या वेळी इंदिरा गांधींनी केवढा कांगावा केला ! निवडणूक प्रचारात मतांचा जोगवा मागताना आपल्या हाती सत्ता आली की देशात कसे स्थिरस्थावर होईल अशी आश्वासने बाईंनी दिली होती. आता दंगलीमागे याचा हात आहे, त्याचा हात आहे असे त्या सांगत आहेत. खरे पाहता 'हात' इंदिरा काँग्रेसचाच आहे. त्यांनीच मुसलमानांना संरक्षण मिळत नाही, त्यांचा छळ होतो, त्यांना नोकऱ्या मिळत नाहीत वगैरे प्रचार केला होता. दिल्लीच्या इमामाची निवडणुका जिंकण्यासाठी बहुगुणांमार्फत त्यांनीच अजीजी केली होती व मुसलमानांच्या सर्व मागण्यांचा विचार होईल असे आश्वासन दिले होते. मुस्लिम अनुनयाची काँग्रेसची परंपरा आहे, निवडणुका जिंकण्यासाठी यावेळी अधिक लांगूलचालन केले त्याची फळे मुसलमानांच्या दंगलींनी देशाला आता मिळत आहेत.

या दंगलींचा भाग सोडला तरी हरिजनांवरील अत्याचारही कमी

झाले नाहीत. बेलचीला हत्तीवरून फिरणाऱ्या इंदिरा गांधींच्या हातात आता सत्ता आली पण हरिजन पूर्वीसारखेच भरडले जात आहेत. खरे पाहता हा प्रश्न पक्षीय राजकारणाचा नाही. पण इंदिरा काँग्रेसने तसा तो केला व सत्ता मिळाली तरी हरिजनांचे प्रश्न सुटत नाहीत की त्यांच्यावरचे अत्याचार कमी करता येत नाहीत. कारण एक तर बाईंचा व काँग्रेसचा हरिजनां-संबंधीचा कळवळा खरा नाही. एकच उदाहरण देतो. हरिजनांचा मुख्य प्रश्न जमिनीसंबंधीचा व आर्थिक आहे. या वर्गाला सांपत्तिक व मालमत्तेच्या दृष्टीने सबळ केले तर त्यांचा सामाजिक व भावनिक प्रश्न राहील पण अत्याचार बंद होतील. काँग्रेस सरकारांनी याबाबत काय केले? वर्गीकृत जाती-जमातींसाठी एक कमिशन नेमण्यात आले होते. गेल्या फेब्रुवारीत त्या कमिशनचा अहवाल बाहेर आला. कमिशन म्हणते – "लोकांकडे २० दश-लक्ष एकर अधिक जमीन असल्याचे जाहीर झाले होते. ही जमीन दुर्बल वर्गाला द्यावयाची होती. पण या जमिनीपैकी फारफार तर २५ टक्के जमिनीचे वाटप झाले व वाटप झालेल्या जमिनीपैकी एक तृतीयांशाहूनही कमी जमीन वर्गीकृत जातीजमातींना वाटण्यात आली." अंतुले म्हणतात, त्याप्रमाणे याच्या आड न्यायालये आली की काय? की हा राजकारण्यांचा व प्रशासनाचा भोंगळपणा आणि बेपर्वाई? म्हणजे गरिबांच्या नावे टाहो फोडला तरी प्रत्यक्षात त्यांच्यासाठी काही होत नाही तोपर्यंत त्यांच्यावर अत्याचार हे होत रहाणारच.

इंदिरा राज्यात कायदा-सुव्यवस्था किती बिघडली हे किरकोळ घटनांवरूनही ध्यानात येऊ शकेल. खुद्द पंतप्रधान इंदिरा गांधींवर राजधानी दिल्लीत कोण्या रामचंद्र लालवाणीने चाकू फेकला. या लालवाणीवर तो हॉस्पिटलमध्ये असताना 'इंदिरा मातेला मारण्याचा तू का प्रयत्न केलास?' असे ओरडत कालिदास परमार नावाच्या एका काँग्रेसवाल्याने चाकू हल्ला केला. पंतप्रधानांच्या जीविताचे जिथे रक्षण करताना ढिलाई होते तेथे निरंकारी प्रमुख बाबा गुरुबचनसिंग यांचा त्यांच्या घरासमोरच गोळ्या घालून खून करण्यात आला यात आश्चर्य काय? निरंकारींनी महिनाभर सत्याग्रह करूनही इंदिरा गांधींचे पोलिस बाबांच्या खून्याला पकडू शकलेले नाहीत. ही घटना एप्रिलमधली.

त्रिपुरामधील घटना अंगावर शहारे आणणारी आहे. १० जूनला ८ खेडी, अनेक छोटया वस्त्या, आदिवासी व इतर यांच्या झगडयात जाळून भस्मसात करण्यात आल्या. तीन हजारांवर लोक या हत्याकांडात ठार झाले असावेत असा अंदाज आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात त्रिपुरातील हत्याकांडासारखे हत्याकांड झाले नाही. या सुव्यवस्थेचे श्रेय त्रिपुराचे मार्क्सवादी मुख्य मंत्री श्री. चक्रवर्ती यांना द्यावे की 'सारे सुरळीत होईल' असे आश्वासन देणाऱ्या इंदिरा गांधींना द्यावे ?

जनता राज्यात स्त्रियांच्या मंगळसूत्राची काळजी इंदिराबाईंनी केली. चोरांच्या भीतीने आता स्त्रिया खोटीच मंगळसूत्रे वापरतात. पण महिलांचा जो अमूल्य अलंकार शील ते इंदिरा गांधींच्या राज्यात सुरक्षित नाही. खुद्द राजधानी दिल्लीत एका अधिकाऱ्याच्या पत्नीला चौथ्या मजल्यावरून पडल्याने मृत्यू आला आणि या प्रकरणी तेव्हाचे काँग्रेसचे सरचिटणीस श्री. अंतुले यांना काँग्रेसच्याच एका खासदाराला पक्षातून काढून टाकावे लागले. बागपत प्रकरण केवढे गाजले. श्रीमती माया त्यागी यांच्यावर पोलिसांनीच अत्याचार केले व गुन्हेगारांना शिक्षा करण्याच्या मागणीसाठी लोकदलाच्या कार्यकर्त्यांना महिनाभर सत्याग्रह करावा लागला. माया त्यागींना अजून न्याय मिळालेला नाही. इंदूरच्या दोघा पोलीस कॉन्स्टेबलनी ऑगस्ट महिन्यात एका विवाहितेवर बलात्कार केला व नंतर तिच्या वस्तीवर जाऊन तिला ते त्रास देऊ लागले तेव्हा लोकांनीच पोलिसांना चोप दिला. त्याच महिन्यात नडियादमध्ये एका अल्पवयीन मुलीला पोलिस ठाण्यावर नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याच्या गुन्ह्यांसाठी तेथील पोलिस सबइन्स्पेक्टरला जन्मठेपेची शिक्षा झाली. बेळगावमधे तरुणीचा विनयभंग केल्याच्या आरोपावरून पोलिस ठाण्याच्या दोन पोलिसांना निलंबित करावे लागले. पोलिसी अत्याचारांच्या अशा कितीतरी घटना आहेत. त्यांचा गाजावाजा न झाल्याने त्या किरकोळ वाटतात. पण गेल्या नऊ महिन्यात त्यांची संख्या खूप वाढली आहे.

रेल्वे गाडयांवरील दरोडे, घरफोडया, चोऱ्या, लूटमार अशा प्रकारच्या गुन्ह्यांचीही संख्या गेल्या नऊ महिन्यांमध्ये फार वाढली आहे. मुंबईसारख्या शहरातील तीन जवाहिऱ्यांच्या दुकानांवर दरोडे पडून त्यांचा तपास

महिने झाले तरी अजूनही लागलेला नाही. व्यक्तिगत दोषापायी खून आणि गटागटातील झगडयांमुळे झालेली लूटालूट व खुनाखुनी अशा गुन्हयांनाही आळा बसलेला नाही. हे सारे प्रकार रोज देशभर घडत असतात. ते पाहिले की या देशाचा कारभार कसा चालतो याचे आश्चर्य वाटेल. अमेरिकेच्या प्रगत समाजात गुन्हेगारीला ऊत आला आहे. भारतही दुर्बल व संभ्रमात पडलेल्या सरकारच्या कारभारामुळे अमेरिकेची बरोबरी करणार असे वाटू लागते.

श्रीमती इंदिरा गांधी नेहमीप्रमाणे कायदा आणि सुव्यवस्थेच्या या गोंधळाला जनता सरकारलाच दोषी धरतात. 'गेल्या दोन वर्षांतील धोरणांमुळे जातीयवादी, भ्रष्टाचारी व धर्मांध प्रवृत्तींनी डोके वर काढले आहे' असे त्यांचे नेहमीचे पालुपद आहे. पण अशा त्राग्याने आणि दोषारोपणाने कोणी फसेल अशी स्थिती नाही.

इंदिरा गांधींच्या अपयशाचे गेल्या नऊ महिन्यांत वारंवार दर्शन घडले आहे. त्यांना स्वतःचे केंद्रीय मंत्रिमंडळ अजून पूर्ण करता आलेले नाही. संरक्षणासारख्या महत्त्वाच्या खात्याला मंत्री नाही. सर्व राज्य सरकारांचीही स्थिती तीच आहे. कोणत्याही राज्यात मंत्रिमंडळे पूर्ण नाहीत. मुख्य मंत्र्यांना त्यांचे आसन स्थिर ठेवण्यासाठी दिल्लीच्या देवतेची रोज आरती करावी लागते. तसे करण्यात कुचराई करतील त्यांचा चेन्ना रेड्डी होईल. चलनवाढीचा व भाववाढीचा प्रश्न उग्र बनला आहे. औद्योगिक उत्पादनात वाढीचा अपेक्षित वेग नाही. कोळसा, वीज, सीमेंट, पोलाद आदींच्या उत्पादनात घट असून त्यांच्या किमती भडकत चालल्या आहेत. राज्यांत अव्यवस्था व गोंधळ वाढतो आहे आणि संघटणेत देश व समाजाऐवजी व्यक्तिगत निष्ठा आणि स्वार्थ बोकाळला आहे. राज्याराज्यांमध्ये कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही अशी स्थिती आहे. एकाच संघटणेतील, एकाच मंत्रिमंडळातील मंत्री एकमेकांच्या विरुद्ध कारवाया करीत आहेत आणि वर चढेल त्याचे पाय ओढण्याचे पुण्यकर्म दुसरा करतो आहे. प्रशासन ठप्प आहे, वटहुकूमांनी राज्य चालविले जात आहे आणि मंत्र्यांना विधानसभांत विरोधी पक्षांच्या भडिमारापुढे माघार घ्यावी लागत आहे.

हे सर्व चित्र म्हणजे वादळाचे व यादवीचे पूर्वचिन्ह आहे. स्थिर व

उत्तम राजवट देण्याचे आश्वासन देऊन इंदिरा गांधी सत्तेवर आल्या. आज देशात वस्तूंच्या किमतीपासून मंत्र्यांपर्यंत कोणीही स्थिर नाही. स्थिर आहेत एकटया पंतप्रधान इंदिरा गांधी. पण ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेली व्यक्ती किती काळ स्थिर राहील ? ही परिस्थिती दुसऱ्या कोणी निर्माण केली नसून त्यांनी स्वतःच निर्माण केली आहे. आपल्या खंबीरपणाच्या व संकटांनी न डगमगून जाण्याच्या वृत्तीची त्या स्वतःच आपल्या तोंडाने जाहिरात करतात. ते ठीकही आहे. पण लोकांना रोकडा पुरावा लागतो. नऊ महिन्यात देशाचे पाऊल पुढे पडल्याचे कोणत्याही क्षेत्रात दिसून आलेले नाही. लोकांच्या अपेक्षा फार नाहीत. स्वस्थपणे व शांतपणे देश प्रगतीच्या मार्गावर चालावा व लोकांना हालअपेष्टा भोगाव्या लागू नयेत एवढीच त्यांची माफक अपेक्षा आहे. पण इंदिरा गांधींकडून ती पुरी होण्याची शक्यता आता उरलेली नाही.

• •

REFBK-0023081

विराट प्रकाशनाला
आमच्या शुभेच्छा

**ideal road builders**
**private limited**

*Office :* 510, Commerce House,
140, Medows Street,
Fort, Bombay – 400 023.
Phone : 273447 - 48

*Site* [redacted]lant, Chandivali Farm,
[redacted]illage,
[redacted]072.
[redacted]